cmyk

दैनिक


# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१८३ | शुक्रवार, दि.३१ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये




## संपादकीय

### बळीराजा वारंवार रस्त्यावर हे चांगल्या व्यवस्थेचे लक्षण नाही!

प्रतिवर्षाप्रमाणे दिवाळीचा मुहूर्त साधून राज्यात शेतकरी आंदोलन सुरु झाले आहे. शेतकऱ्यांना प्रतिवर्षी आंदोलन करावे लागणे हे दुर्दैवी तर आहेच पण असंवेदनशीलही आहे. या आंदोलनाला अनेक छटा आणि कंगोरे असले तरी काही जण या वाहत्या गंगेत हात धुवून घेत असले तरी शेतकऱ्यांचे प्रश्न, त्याची फसवणूक आणि त्याचे शोषण ही गंभीर बाब आहे.

# परळीत डिसेंबरमध्ये महापशुधन एक्स्पो २०२५

## पशुपालन करण्यासाठी शेतकऱ्यांना मिळणार चालना, शासनाकडून ५.८४ कोटी खर्चाची मान्यता

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील पशुपालक आणि कृषी क्षेत्राशी संबंधित उद्योगांसाठी महापशुधन एक्स्पो २०२५ हे देशपातळीवरील पशुपक्षी प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १० ते १२ डिसेंबर २०२५ या तीन दिवसांत हे प्रदर्शन पार पडणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान, पशुपालनातील नव्या संधी आणि व्यवसायवृद्धीची दिशा देण्यासाठी आयोजित या प्रदर्शनासाठी सरकारने ५ कोटी ८४ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून, याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे..**



राज्याच्या पशुसंवर्धन आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकारातून परळी वैजनाथला देशपातळीवरील महत्त्वाचा मान मिळाला आहे. परळीच्या इतिहासात प्रथमच असे भव्य आणि अनोखे पशुपक्षी प्रदर्शन आयोजित होणार आहे. या

### पशुपालकांसाठी मार्गदर्शन आणि नवतंत्रज्ञान

या प्रदर्शनाचे नियोजन पशुसंवर्धन आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. यामध्ये पशुसंवर्धन क्षेत्रातील व्यावसायिक, तज्ज्ञ, उद्योगपती आणि विविध संस्थांचे स्टॉल्स लावले जाणार आहेत. पशुपालकांना नव्या यंत्रसामग्री, आधुनिक साधने आणि व्यवसायातील नव्या कल्पना जाणून घेण्याची संधी मिळणार आहे. महापशुधन एक्स्पो २०२५ हा राज्यातील शेतकरी, पशुपालक आणि नागरिकांसाठी प्रेरणादायी आणि ऐतिहासिक सोहळा ठरणार आहे.

प्रदर्शनात महाराष्ट्रासह देशभरातील जातीवंत आणि उत्कृष्ट जनावरे दाखवली जाणार आहेत. यामुळे पशुपालकांना नव्या तंत्रज्ञानाची, प्रगत पशुपालन संगोपन पद्धतींची आणि व्यवसायवृद्धीच्या नव्या संधीची माहिती मिळणार आहे. शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे की, भारत हा जगातील सर्वात मोठा पशुधन असलेला देश असून, एकूण पशुधनापैकी तब्बल ११.६ टक्के भारतात आहे. ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### ३२ टक्के उमेदवार गुन्हेगारी पार्श्वभूमीचे

नवी दिल्ली : २०२५ च्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात कलंकित उमेदवारांचे वर्चस्व आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, ६ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीत भाग घेणाऱ्या १,३०३ उमेदवारांपैकी ४२३ (३२ टक्के) उमेदवारांवर गुन्हेगारी खटले आहेत, तर ३५४ (२७ टक्के) उमेदवारांवर गंभीर गुन्हेगारी खटले आहेत. या परिस्थितीवरून असे दिसून येते की, सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट सूचना असूनही, राजकीय पक्षांनी स्वच्छ रेकॉर्ड असलेल्या उमेदवारांपेक्षा गुन्हेगारी रेकॉर्ड असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले आहे. ३३ उमेदवारांवर खुनाचे गुन्हे दाखल आहेत, तर ८६ उमेदवारांवर खून करण्याचा प्रयत्न करण्याचे गुन्हे दाखल आहेत. ४२ उमेदवारांवर महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांसाठी खटले दाखल केले आहेत, ज्यात दोघांवर बलात्काराचे गंभीर आरोप आहेत.

### विरोधात बदनामीकारक मोहीम–अनिल अंबानी

मुंबईः अनिल अंबानी यांच्या रिलायन्स ग्रुपने एक निवेदन जारी करून त्यांच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचवण्यासाठी एकत्रित मोहीम राबवल्याचा आरोप केला आहे. कोब्रापोस्ट या तपास पोर्टलद्वारे अपेक्षित ऑनलाइन खुलासा होण्यापूर्वी, ग्रुपने म्हटले आहे की, कॉर्पोरेट प्रतिस्पर्धी त्यांच्या सूचीबद्ध कंपन्यांच्या रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर आणि रिलायन्स पॉवरची प्रतिष्ठा खराब करण्यासाठी निंदा, चुकीची माहिती आणि चारित्र्यहनन करत आहेत. स्टॉक एक्सचेंजमध्ये दाखल केलेल्या निवेदनात, समूहाने दावा केला आहे की कोब्रापोस्टने आमंत्रित केलेल्या पत्रकार परिषदेत, द लूटवाला: हाऊ इंडियन बिझनेस इज रॉबिंग इंडियन्स आय. द लेजर ऑफ लाईज असे टॅग केले होते. अंबानीच्या निवेदनात भर देण्यात आला आहे की, ही माहिती बऱ्याच काळापासून सार्वजनिक क्षेत्रात आहे आणि वैधानिक अधिकाऱ्यांनी आधीच त्याची तपासणी केली आहे.

### भारत २०४७ पर्यंत ४०० विमानतळ उभारणार !

दिल्लीः भारताने २०४७ पर्यंत देशात ३५० ते ४०० विमानतळ उभे करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले आहे, अशी माहिती केंद्रीय नागरी हवाई वाहतूकमंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी दिली. ही पायाभूत सुविधांची योजना संधी, विकास आणि कनेक्टिव्हिटी वाढवण्यासोबतच उच्चतम हवाई सुरक्षा मानके कायम ठेवण्याची देशाची बांधिलकी दर्शवते, असे त्यांनी सांगितले. विज्ञान भवन येथे पहिल्या आशिया पॅसिफिक रिजन अपघात तपास गटाच्या बैठकीच्या उद्घाटन सत्रात नायडू यांच्या वतीने वाचून दाखवलेल्या संदेशात ते बोलत होते. आशिया–पॅसिफिक क्षेत्रातील सदस्य राष्ट्रांच्या सहकार्यामुळे सुरक्षा देखरेख आणि अपघात प्रतिबंधाच्या बाबतीत उत्तम मानके निश्चित झाली आहेत, असे ते म्हणाले.

# ऑडिशनला आलेल्या १७ मुलांना ओलीस ठेवणाऱ्या माथेफिरूचा एन्काऊंटर




**मुंबई । प्रतिनिधी**

राजधानी मुंबईतील पवई परिसरात शाळकरी मुलांना ओलीस ठेवल्याची धक्कादायक घटना गुरूवारी घडली. पवई येथील आरए स्टुडिओत ऑडिशनसाठी आलेल्या १७ लहान मुलांसह दोन पालकांना एका खोलीत डांबून ठेवण्यात आले होते. या घटनेची माहिती मिळताच पोलीस, अग्निशमन ▶▶ पान २ वर

### पोलिसांचे यशस्वी बचावकार्य

दुपारी पावणे दोन वाजता पोलिसांना कॉल आला. त्यानंतर तात्काळ स्पेशल युनिट्स आणि क्विक ॲक्शन फोर्स घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आरोपीशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला, पण यश आले नाही. अखेर पवई पोलीस अधिकाऱ्यांनी बाथरूममधून खोलीत प्रवेश केला. आतमध्ये असलेल्या एका व्यक्तीच्या मदतीने सर्व १९ जणांची (१७ मुले, १ प्रौढ, १ स्थानिक) सुखरूप सुटका करण्यात आली. रेस्क्यू ऑपरेशनदरम्यान एक ज्येष्ठ नागरिक महिला आणि एक लहान मुलगी जखमी झाली.

### माथेफिरुच्या कृत्याचा तपास सुरु

उप पोलिस आयुक्त दत्ता किशन नलावडे यांनी सांगितले की, दुपारी १:४५ वाजता या घटनेची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिस पथके घटनास्थळी दाखल झाली. आत अडकलेल्या मुलांचा बचाव करण्यात आला. एकूण १७ मुले आत अडकलेली होती, ज्यांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे. आरोपीने त्यांना ओलीस ठेवण्यामागचे कारण व त्याच्या मागण्या काय होत्या याबाबत पोलिस तपास करत आहेत.

# डोनाल्ड ट्रम्पविरोधात बोलण्याचा मोदींमध्ये दम नाही–राहुल गांधी

**पाटणा । वृत्तसंस्था**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात बोलण्याचे धाडस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात नाही. भारत आणि पाकिस्तानमध्ये संघर्षविराम घडवल्याचा दावा ट्रम्प वारंवार करत आहेत. पण, मोदींमध्ये ट्रम्प खोटे बोलत असल्याचे म्हणण्याइतका दम नाही, असा शाब्दिक हल्लाबोल काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केला.

बिहारमधील प्रचार सभेत



बोलताना राहुल यांनी प्रामुख्याने मोदी आणि केंद्र सरकारला लक्ष्य केले. मोदींचा अमेरिका दौरा निश्चित झाला होता. मात्र, ते ट्रम्प यांच्या धास्तीपोटी गेले नाहीत, असा दावाही त्यांनी केला. राहुल यांनी ▶▶ पान २ वर

# भिमराव धोंडे यांच्या राजकीय हालचालीनंतर शासनाकडून बूस्टर

## शेतकरी सूतगिरणीस ७२५७ कोटीच्या सुधारित प्रकल्प अहवालास शासनाची मान्यता!

**मुंबई–बीड । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यामध्ये १९९१ मध्ये स्थापन झालेल्या शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्यादित आष्टी या सूतगिरणीच्या प्रकल्प उभारणीसाठी राज्य शासनाच्या सहकार व पणन वस्त्रोद्योग विभागाने सुधारित प्रकल्प अहवालास मान्यता दिली असून, त्यामधून सभासद भाग भांडवल, शासकीय भाग भांडवल आणि दीर्घ मुदतीचे कर्ज काही अटी शर्तीच्या अधीन राहून मान्यता दिली आहे.

मागील विधानसभा निवडणुकीमध्ये बंडखोरी करत पराभव स्वीकारावा लागलेले माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आगामी नगरपालिका जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी वेगळ्या हालचाली सुरू केल्याची चर्चा होती ते भाजपाला सोडचिठ्ठी देणार अशीही चर्चा रंगू लागल्यानंतर अचानक राज्य शासनाने त्यांनी स्थापन केलेल्या शेतकरी सहकारी सूतगिरणीच्या सुधारित प्रकल्प अहवालास मान्यता दिली आहे. विशेष म्हणजे त्यांनी राजकीय हालचाल करू नये यासाठी हा बूस्टर दिला ▶▶ पान २ वर

# रुपाली चाकणकरांचे पद धोक्यात?

## ‘त्या’ वक्तव्यासंदर्भात अजित पवार विचारणार जाब

**पुणे । प्रतिनिधी**

मागच्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या महिला डॉक्टराच्या आत्महत्येनंतर महाराष्ट्रातील राजकीय वातावरण मोठ्या प्रमाणात तापले आहे. या प्रकरणात महिलांच्या न्यायासाठी आवाज उठवावा त्या महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकरांनी मात्र पीडितेलाच



आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केले. यानंतर विरोधकांनी जोरदार टीका करून चाकणकरांच्या या भूमिकेवर संताप व्यक्त केला. पीडित तरुणीच्या वडिलांनी देखील रुपाली चाकणकरांच्या वक्तव्यावर आक्षेप घेत त्यांची उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे तक्रार केली.

गुरूवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महिला डॉक्टरच्या कुटुंबीयांशी फोनवरून संवाद साधला. या वेळी कुटुंबीयांनी अजित पवारांकडे महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्या भूमिकेविषयी ▶▶ पान २ वर

## तर आम्ही...

एक रस्ता बंद केला
तर झाकलेल्या डोळ्यातून पाणी आले
लाखो फास झाडाला लटकले
तेव्हा तराजूचे कापरे का नाही झाले..?
देवता म्हणतो आम्ही तिला
पण ती देवासारखी कुठं वागते आहे.?
भुकेल्या माणसांच्या छाताडावर
फक्त आदेशाचे गोळे डागते आहे..
न्याय कोणाकडे मागायचा
सगळेच विरोधात गेले तर
फक्त एकदाच विचार करा
आमच्या हातात दगड गोटे आले तर..?

– संदिप जगताप.

# फटाक्यांच्या आवाजाने वाढले बहिरेपणाचे रुग्ण

**छ. संभाजीनगर। प्रतिनिधी**

दिवाळीत फोडलेल्या फटाक्यांच्या मोठ्या आवाजामुळे बहिरेपणाचे रुग्ण तब्बल दहा टक्क्यांनी वाढले आहेत. या दिवसांत धुरामुळे शहरात वायुप्रदूषण होऊन अनेकांना ॲलर्जी, सर्दी, खोकला, डोकेदुखी आणि कानदुखीचा त्रासही वाढला आहे. त्यामुळे उपचारासाठी त्यांना रुग्णालयात धाव घ्यावी लागली. अशा रुग्णांची संख्या ३० टक्क्यांपर्यंत वाढली होती. आताही अनेकांवर औषधोपचार सुरू असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले. दीपोत्सवाच्या या चार दिवसांत धूर सोडणाऱ्या फटाक्यांमुळे ▶▶ पान २ वर

# कवडगाव संतप्त ग्रामस्थांचे पाण्याच्या टाकीवर शोले स्टाईल आंदोलन

## कवडगाव ग्रामस्थ आक्रमक, सुषमा अंधारेंनी आवाहन करत खाली उतरविले

**वडवणी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कवडगाव येथील महिला डॉक्टर स्व. संपदा मुडे यांनी राजकीय व शासकीय व्यवस्थेमुळे आत्महत्या केली या प्रकरणाला अनेक दिवस होऊन हि एस आय टि स्थापन करण्यात आलेली नाही त्यामुळे या मागणीसाठी काल कवडगाव ग्रामस्थांनी, तरूणानी पाण्याच्या टाकीवर पेट्रोल बाटल्या व दोरखंड घेऊन शोले स्टाईल आंदोलन केले. ▶▶ पान २ वर



# सीबीएसई दहावी–बारावी बोर्ड परीक्षेच्या तारखा जाहीर

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

महाराष्ट्र स्टेट बोर्डाच्या १० वी आणि १२ वी बोर्ड परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्यानंतर आता सीबीएसई बोर्ड परीक्षेचेही वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार, १७ फेब्रुवारी २०२६ पासून या परीक्षा सुरू होणार आहेत. गेल्याच महिन्यात अंदाजित वेळापत्रक जाहीर करण्यात आले होते. आता, केंद्रीय परीक्षा बोर्डाने नियोजित वेळापत्रक जारी केले आहे. विशेष म्हणजे परीक्षा सुरू होण्याच्या तब्बल ११० दिवस आधी म्हणजेच चार महिन्यांपूर्वीच हे वेळापत्रक जाहीर करण्यात आल्याने विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तयारीसाठी मोठा ▶▶ पान २ वर

# बीडमध्ये कॅनरा बॅक फोडली:लाखोची रक्कम गायब

**बीड । प्रतिनिधी**

बीड पासुन जवळच असलेल्या पाली येथील कॅनरा बँकेच्या शाखेची मागील भिंत अज्ञात चोरट्यानी फोडुन कटरद्वारे तिजोरी फोडून आतिल ५० लाखा पेक्षा अधिकची रक्कम चोरून नेल्याची घटना घडली या प्रकरणी बीड ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून घटना स्थळी एलसीबीने पाहणी करत तपासाची चक्रे फिरवली.

बीड पासून जवळच असलेल्या धुळे–सोलपुर ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३० ऑक्टोबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहूः २६.०० क्विंटल | २,४०० | २,७६१ | २,५६१ |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.५० क्विंटल | २,५०० | २,९८६ | २,७०१ |
| मका/लोकलः ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : १९.०० क्विंटल | ३,८०१ | ७,००० | ५,७६७ |
| उडीद : १८.५० क्विंटल | ३,८५० | ५,२३६ | ४,७३० |
| बाजरीः ५६.५० क्विंटल | २,२५० | २,७९० | २,५९४ |
| मुगः४.५० क्विंटल | ४,९०० | ५,७०१ | ५,३०० |
| सोयाबीनः ९८.५० क्विंटल | ४,२७१ | ४,३११ | ४,२९४ |
| हरभराः १.०० क्विंटल | ४,९५१ | ४,९५१ | ४,९५१ |







cmyk

## अग्रलेख

# बळीराजा वारंवार रस्त्यावर हे चांगल्या व्यवस्थेचे लक्षण नाही !

प्रतिवर्षाप्रमाणे दिवाळीचा मुहूर्त साधून राज्यात शेतकरी आंदोलन सुरु झाले आहे. शेतकऱ्यांना प्रतिवर्षी आंदोलन करावे लागणे हे दुर्दैवी तर आहेच पण असंवेदनशीलही आहे. या आंदोलनाला अनेक छटा आणि कंगोरे असले तरी काही जण या वाहत्या गंगेत हात धुवून घेत असले तरी शेतकऱ्यांचे प्रश्न, त्याची फसवणूक आणि त्याचे शोषण ही गंभीर बाब आहे. सण-वार सोडून उगाच कोणी पावसात आणि बोचऱ्या थंडीत रस्त्यावर उतरणार नाही.

यंदा शेतकरी दोन गोष्टींसाठी रस्त्यावर उतरलेत. विदर्भात माजी आमदार प्रहार शेतकरी संघटनेचे नेते यांनी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या, शेतकऱ्याचा सातबारा उतारा कोरा करा अशी मागणी करत जोरदार आंदोलन सुरु केले आहे. तर पश्चिम महाराष्ट्रात शेतकरी संघटनेने उसाला प्रतिटन ३७५५ रुपये प्रतिटन एकरकमी विनाकपात पैसे द्या अशी उस परिषदेत मागणी करत उसाच्या गाड्या आडवत, टायर पेटवायला सुरुवात केली आहे. राज्य शासन लाडक्या बहिणी आणि अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत यामध्ये घाईला आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्जमाफीचा दिलेला शब्द मान्य करत कर्जमाफी योग्य वेळी करु असे म्हटले आहे. पण समोर असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि राजकीय वातावरण लक्षात घेऊन 'आत्ता नाही तर पुन्हा नाही' असे म्हणत एल्गार पुकारला आहे. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी, सातबारा कोरा करा, दिव्यांगांना न्याय द्या, या व अन्य अशा २० प्रमुख मागण्यांसाठी आक्रमक झालेले माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या महाएल्गार आंदोलनामुळे वर्धा, चंद्रपूर, हैद्राबादसह अमरावती आणि जबलपूर महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. मंगळवारी रात्री प्रहारचे नेते बच्चू कडू, शेतकरी नेते राजू शेट्टी, महादेव जानकर, वामनराव चटप रात्री रस्त्यावरच झोपले, महामार्ग रोखल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली. शेकडो ट्रॅक्टर आणि वाहनांसह आंदोलन महामार्ग रोखून बसले. प्रकाश आंबेडकर यांनी या आंदोलनाबाबत आणि कडू यांच्याबाबत केलेले विधान महत्त्वाचे आहे. याच मंडळीसोबत सरकारमध्ये मंत्री म्हणून बसताना शेतकरी कुठे गेले होते अशी पृच्छा करत कडू यांचे हे आंदोलन कशासाठी, कुणासाठी असे प्रश्न निर्माण केले आहेत. शरद जोशींच्या शेतकरी संघटनेतील नेत्यांचा स्वतंत्र अभ्यास गरजेचा आहे. त्यातून जे वास्तव पुढे येईल ते सर्वांच्या डोळ्यांना अंजन ठरेल. महाराष्ट्रात सर्वच पक्षात टीकेची, मागण्यांची आणि भाषणाची आणि कामाची पातळी घसरली असल्याचे दिसून आले आहे. त्यामागे मिळणारी प्रसिद्धी आणि विविध हेतू असले तरी एकूणच सर्वांची व महाराष्ट्राची इभ्रत जाते पण हे सर्वांच्या लक्षात आले तरी कुणाच्या आचरणात येत नाही, हेच खरे दुर्दैव म्हणायला हवे. अरे ला कारे करणे हाच नैसर्गिक न्याय समजला जातो आहे. त्यातूनच ॲनाकोंडा, अजगर, आयत्या बिळातला नागोबा, महाराष्ट्राचा पप्पू अशा टीपण्या एकीकडे तर दोन चार आमदार कापा वगैरे चिथावणीखोर भाषणे ऐकू येत आहेत. लोकांना त्यातील मर्म लक्षात येते आहे. तथापि प्रत्येक पक्षाने आपली वॉर रुम आणि त्या कामासाठी माणसे पेरली आहेत. शेतीमालाला किफायतशीर दर हा विषय कित्येक वर्षांचा जुना आहे. त्याबाबत सतत आवाज उठवला जातो. ऊस पिकात ऊस उत्पादक शेतकरी सोडून सारे मालामाल होतात, शेतकऱ्यांच्या माथी केवळ कर्ज आणि ते कसे भागवायचे याची विवंचना राहते, दूधाला दोन रुपये दरवाढ मिळाली की दुसरे दिवशी पशूखाद्य अडीच रुपये महागते. एका हाताने द्यायचे, दुसऱ्या हाताने काढून घ्यायचे, खतांचे दर, बियाण्याचे दर, किटकनाशकांचे दर, मजुरीचे दर असे अनेक फास शेतकऱ्यांना गळफासाकडे खेचत असतात. म्हणूनच सण-वार सारे बाजूला ठेवून शेतकरी मशाल हाती घेऊन आंदोलन छेडतो. दरवर्षाची ही कहाणी आहे. पण शेतकरी कर्जात बुडत आहे. साखर कारखाने तोट्यात आणि साखर सम्राट मालामाल, शेतकरी कर्जबाजारी पण ऊस तोड आणि वाहतूकदार मालामाल, शेतकरी फाटक्या खिशांचा पण सरकारला टनामागे चांगले करउत्पन्न अशी ही व्यवस्था आहे. काटेमारीसह अनेक विषय आ वासून उभे आहेत. सहकारी साखर कारखाने बंद पाडून ते विकत घेणारे नवे मालक निर्माण झाले आहेत. कुणा सम्राटाचे दहा कारखाने, कुणाचे पाच असे दिसते आहे. दोन दोनशे एकर मोक्याचे भूखंड असलेले कारखाने ४०-५० कोटीला खरेदी केले जात आहेत. शेतकरी नेत्यांनी शोषणाच्या या विषयात लक्ष घातले पाहिजे, मुख्यमंत्री फडणवीस यांनी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. एकुणच भाजपाचे ए फॉर अमेठी नंतर बी फॉर बारामती सुरु झाले आहे. ऊस आणि संपूर्ण कर्जमाफीचे आंदोलन रोज भडकताना दिसते आहे. शेतकरी शोषण अजिबात थांबलेले नाही, व्यवस्था बदलाशिवाय ते थांबेल असे वाटत नाही. सणावाराला आणि थंडी पावसात प्रतिवर्षी शेतकऱ्यांना आंदोलन करायला लागणे हे चांगल्या व्यवस्थेचे लक्षण नाही, ते कुणाला शोभणारे नाही. आधीच निसर्ग कोपला आहे, पूर, महापूर, अतिवृष्टी, जमीनीची धूप, पिक वाहून जाणे अशी एकीकडे स्थिती आहे. पाऊस थांबायला तयार नाही अशी यंदाची अवस्था आहे. खरीप हंगाम वाया गेला, रब्बीची तयारी नाही. बोकांडी कर्ज आहे आणि सर्व व्यवस्था लुटत आहेत अशा सर्व दिशांनी होणाऱ्या अन्यायात शेतकरी कायमचा पिचला जात आहे. शेतकरी आंदोलन हे कर्जमाफी आणि ऊस दरासाठी असले तरी त्यामध्ये व्यवस्थाविरोधी संताप आणि आक्रोश आहे.

# आणखी २६ लाख लाडक्या बहिणींचे पैसे झाले बंद !

## सरकारने उचलले पुन्हा मोठे पाऊल

**मुंबई । प्रतिनिधी**

**अदिती तटकरे यांनी दिलेल्या महितीनुसार २६.३ लाख अपात्र महिलांना योजनेतून वगळण्यात आले. तोपर्यंत १० महिने या महिलांना दर महिला दीड हजार रुपयांचा लाभ मिळत होता. पडताळणी प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी सरकारने ३ हजार ७८० कोटी ते ४ हजार ३३८ कोटी दरम्यानची रक्कम अपात्र अर्जदारांना वितरित केली असण्याची शक्यता आहे.**

महायुतीसाठी गेमचेंजर ठरलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरुवातीपासूनच वादात राहिली. ही योजना जाहीर झाल्यापासूनच विरोधकांनी टीका केली. यातच या योजनेबाबत नवनवीन माहिती मिळत आहे. माहितीच्या अधिकारातून काही धक्कादायक आकडेवारीही समोर येत आहे. या एका योजनेमुळे सरकारी तिजोरीवर मोठा आर्थिक भार येत असून, अन्य योजनांच्या निधीला कात्री लागत असल्याचे पाहायला मिळत आहे. राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थ्यांनी येत्या १८ नोव्हेंबरपूर्वी ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण करण्याची मुदत देण्यात आलेली आहे. महिलांनी या कालावधीत आपले ई-केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी आणि लाभार्थी महिलांना नियमितपणे आर्थिक लाभ मिळावा यासाठी ई-केवायसी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. माहितीच्या अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जुलै २०२४ पासून सुरूवात झाली. या योजनेअंतर्गत महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यात येतात. जून २०२५ पर्यंत सरासरी २ कोटी ४० लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळाला होता. त्यासाठी ४३ हजार ४५ लाख कोटी इतकी रक्कम वितरित करण्यात आली. पडताळणीनंतर मे ते जून २०२५ दरम्यान लाभार्थ्यांना वगळण्यात येऊ लागले. आता सरकारने आणखी २६ लाख लाडक्या बहिणींचे पैसे बंद करण्याचे ठरविले आहे.

# विदर्भात पावसाचा अंदाज; राज्यातील काही भागात आज, उद्या पावसाची शक्यता

**पुणे । प्रतिनिधी**

**मोंथा चक्रीवादळाची तीव्रता कमी झाल्यानंतर ठळक दाब क्षेत्राची निर्मीती झाली आहे. ही प्रणाली विदर्भातील गडचिरोली आणि गोंदीया जिल्ह्यापर्यंत पोहचत या भागात पाऊस पडत आहे. शुक्रवारी राज्यातील काही भागात पावसाचा अंदाज देण्यात आला आहे.**

मोंथा चक्रीवादळाची तीव्रता कमी झाल्यानंतर त्याचे रुपांतर ठळक कमी दाब क्षेत्रात झाले आहे. ही प्रणाली पूर्व विदर्भ आणि शेजारच्या दक्षिण छत्तीसगड भागात होती. ही प्रणाली उत्तर वायव्येकडे वाटचाल करत आहे. समुद्रसपाटीपासून ७.६ किलोमीटरपर्यंत चक्राकार वाऱ्याची स्थिती आहे. ही प्रणाली पुढे उत्तरेकडे वाटचाल करत पूर्व मध्य प्रदेश आणि शेजारच्या उत्र छत्तीसगडकडे सरकून तीव्रता कमी होण्याची शक्यता आहे. राज्यातील काही भागात पुढील दोन दिवस पावसाचा अंदाज आहे. विदर्भातील बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, यवतमाळ, वाशीम, भंडारा, गोंदीया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात काही ठिकाणी ढगाळ हवामानासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. तर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, बीड आणि धाराशिव जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज देण्यात आला. मध्य महाराष्ट्रातील पुणे, अहिल्यानगर, नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदूरबार जिल्ह्यातही काही ठिकाणी ढगाळ हवामानासह हलक्या सरींची शक्यता वर्तविण्यात आली. शनिवारी मध्य महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाड्यातील लातूर तसेच नांदेड जिल्ह्यात काही ठिकाणी पावसाचा अंदाज देण्यात आला. रविवारी बीड, जालना छत्रपती संभाजीनगर, नाशिक, धुळे, जळगाव आणि नंदूरबार तसेच पालघर आणि ठाणे जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली.

# घरकुलांच्या हप्त्यांसाठी जालना पंचायत समितीला टाळे ठोकणार!

**जालना । प्रतिनिधी**

**शासनाने शेतकरी, शेतमजूर ,कामगार ,विधवा यांच्यासाठी सुरू केलेल्या घरकुल योजनेचे प्रलंबित हप्ते तातडीने लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करावेत नसता जालना पंचायत समितीला टाळे ठोकण्याचा इशारा देण्यात आला आहे. या संदर्भात जालना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना विचारले असता ते म्हणाले की बजेट नाही असे सांगून खरी माहिती दाबण्याचा प्रयत्न केला असल्याचे यामधून दिसून येत आहे. यावरून असो दिसून येते की टक्केवारी घेतल्याशिवा घरकुल चा हप्ता टाकल्या जात नाही अशी पण चर्चा दररोज पंचायत समितीमध्ये ऐकायला मिळत आहे.**



गुरूवारी ( ता.३०) लाभार्थ्यांसह गटविकास अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. ओला दुष्काळ, ढगफुटी यामुळे हाता- तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिसकावून घेतला. लाभार्थ्यांनी स्वतः जवळील सोने विकून तसेच सावकाराकडून कर्ज काढून घरकुलांचे बांधकाम केले. पंचायत समिती कार्यालयात चकरा मारूनही अधिकारी उडवा-उडीची उत्तरे देतात. परंतु गट विकास अधिकारी म्हणतात बजेट नाही अशी पसरित आहे. या परिणामी लाभार्थी वैतागले असून मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणारे लाभार्थी सावकाराचे व्याज भरता- भरता मेटाकुटीस आले आहेत. असे नमूद करत येत्या १० नोव्हेंबर पर्यंत लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान जमा न झाल्यास जालना पंचायत समितीला टाळे ठोको आंदोलन केले जाईल. असा इशारा देण्यात आला आहे.

# हरित माजलगाव' प्रकल्पांतर्गत रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलकडून भव्य वृक्षारोपण

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलने 'हरित माजलगाव' या महत्वाकांक्षी प्रकल्पाचा दुसरा टप्पा दि ३० ऑक्टोबर गुरुवार रोजी यशस्वीपणे सुरू केला. शहरातील मुख्य रस्ता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते मौलाना आझाद चौकापर्यंतच्या दुसऱ्या वर्षीच्या पहिल्या टप्प्यात १०१ झाडांचे वृक्षारोपण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले आहे.माजी नगराध्यक्ष डॉ.अशोकराव तिडके आणि सामाजिक कार्यकर्ते मुरलीधरराव रत्नपारखे यांच्या शुभ हस्ते सकाळी १०:३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात वृक्षारोपण करून या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी माजलगाव येथील सर्व पत्रकार बांधवांनी उपस्थित राहून या उपक्रमाला पाठिंबा दिला.**

पत्रकार संघाच्या संकल्पनेतून रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल या 'हरित माजलगाव' प्रकल्पाची अंमलबजावणी करत आहे.गेल्या वर्षी रोटरी क्लबने जुने बसस्थानक ते छ. संभाजी महाराज चौक या मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून सर्व झाडांचे यशस्वीरित्या संगोपन केले आहे, जी झाडे आज उत्तम प्रकारे वाढत आहेत.याच आत्मविश्वासातून, यावर्षी शहरातील धारूर रोडवर १०१ झाडे लावण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यावेळी माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस,माजी नगरसेवक शरद यादव,पत्रकार संघाचे अध्यक्ष तुकाराम येवले,जेष्ठ पत्रकार उमेश मोगरकर, पत्रकार सुहास नागापुरे, पत्रकार वैजनाथ घायतिडक, पत्रकार ज्योतीराम पंढरपोटे, पत्रकार हरीश यादव व पत्रकार बबलु माने यांची प्रमुख उपस्थिती होती.तर रोटरी उप प्रांतपाल रो.प्रवीण देशपांडे रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलचे अध्यक्ष रो.विनोद जाधव,सचिव रो. कैलास येलशेटे, आणि प्रोजेक्ट चेअरमन रो.सुनील शिंदे व रो.आनंद शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम पार पडला. वृक्षारोपण कार्यक्रमात रो. इम्रान नाईक,रो.श. डॉ.यशवंत राजेभोसले,रो.डॉ. सुनील गरड,रो. अंकुश राठोड,रो. उमाकांत सोळंके, इंजि.गजेंद्र खोत, इंजि.कृष्णा सोळंके यांच्यासह अनेक रोटरी सदस्य उपस्थित होते.ही मोहीम यशस्वी करण्यासाठी रो. पांडुरंग चांडक रो. प्रभाकर शेटे व रमेश बाहेती यांनी विशेष परिश्रम घेतले. पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने उजाड असलेले माजलगाव शहर हिरवेगार करण्यासाठीचा संकल्प म्हणजे रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलचा हरित माजलगाव प्रकल्प आहे यात सध्या तरी माजलगाव शहरातून जाणाऱ्या दोन्हीही राष्ट्रीय महामार्गांवर मोठया प्रमाणात वृक्षारोपण करण्याचे नियोजन आहे मागील वर्षी शहरातील अर्ध्या पेक्षा अधिक मुख्य रस्त्यावर यशस्वीरित्या वृक्षारोपण करण्यात आले रोटरीच्या या वर्षीच्या पहिल्या टप्प्यात धारूर रोड वर १०५ झाडांचे वृक्षारोपण करण्यात येतआहे तर रोटरी च्या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळून लोकसहभाग वाढत असल्याने दुसऱ्या टप्प्यात छ.संभाजी महाराज चौक ते केसापूरी कॅम्प पर्यंत वृक्षारोपण करण्याचा संकल्प आहे.



## पान १ वरून...

### परळीत डिसेंबरमध्ये

महाराष्ट्रात पशुपालन हा शेतकऱ्यांचा स्थिर उत्पन्नाचा व्यवसाय असून अनेकांना तो कुटुंबाचा आर्थिक आधार ठरत आहे. तसेच, राज्यात ज्या भागातील शेतकरी पशुपालनावर अवलंबून आहेत, त्या भागात आत्महत्यांचे प्रमाण कमी असल्याचे अहवालात नमूद आहे. त्यामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकरी व पशुपालकांना अधिक मदत आणि प्रोत्साहन देण्याची गरज आहे. तसेच, त्यांचा राज्याच्या जीडीपीमधील वाटा वाढविणे आवश्यक असल्याचे शासन निर्णयात सांगण्यात आले आहे.

------------

### डोनाल्ड ट्रम्पविरोधात बोलण्याचा

निवडणुकांमधील कथित मतचोरीच्या आरोपाचा पुनरूच्चार केला. मागील वर्षीच्या लोकसभा निवडणुकीत मतचोरी करून भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएने केंद्रात पुन्हा सरकार स्थापन केले. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बनवलेली राज्यघटना उद्धवस्त करण्याचा प्रयत्न मोदी आणि एनडीए करत आहेत, असे त्यांनी म्हटले. बिहारमध्ये विरोधकांच्या महाआघाडीला सत्ता मिळाल्यास सर्व समुदायांचे प्रतिनिधित्व असणारे सरकार स्थापन होईल. ते सरकार शेतकरी, मजूर, दलित आणि दुर्बल घटकांचे असेल. केंद्र आणि बिहार सरकारांची धोरणे कामगारविरोधी आहेत. त्यामुळे बिहारमधील तरूणांना रोजगारासाठी इतर राज्यांत जावे लागते. आम्हाला सत्ता मिळाल्यास बिहार केवळ कामगार पुरवणारे राज्य ठरणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

--------

### ऑडिशनला आलेल्या १७ मुलांना ओलीस

दल आणि एनएसजी कमांडो घटनास्थळी दाखल झाले आणि तात्काळ बचावकार्य सुरू केले. मुलांना ओलीस ठेवणारा आरोपी रोहित आर्य आणि पोलीस यांच्यात चकमक झाली. आरोपीने पोलिसांवर गोळीबार केला, त्याला प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनीही क्रॉस गोळीबार केला. या गोळीबारात आरोपी रोहित आर्य जखमी झाला आणि उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. पवई येथील आरए स्टुडिओत दुपारी २ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे शाळकरी मुले गेल्या ४-५ दिवसांपासून येथील स्टुडिओत प्रशिक्षणासाठी येत होती. ऑडिशनच्या नावाखाली या मुलांना बोलावण्यात आले होते. ऑडिशनसाठी आलेल्या मुलांना दुपारच्या जेवणासाठी सोडल्यानंतर रोहित आर्य नावाच्या व्यक्तीने त्यांना एका खोलीत बंद करून ओलीस ठेवले. ओलीस ठेवलेल्यांमध्ये १५ वर्षांखालील १७ मुले-मुली आणि दोन पालकांचा समावेश होता. आरोपी रोहित आर्यने एक व्हिडिओ जारी केला. ''मी दहशतवादी नाही, माझ्या काही साध्या मागण्या आहेत. मी आत्महत्या करण्याऐवजी या मुलांना बंदी बनवले आहे,'' असे त्याने व्हिडिओत म्हटले. त्याला काही लोकांशी संवाद साधायचा असून त्यांना प्रश्न विचारायचे असल्याचे त्याने सांगितले. रोहित आर्यने आपण पैसे किंवा हिंसाचाराची मागणी करत नसल्याचे स्पष्ट केले. मात्र, शिक्षण विभागासाठी त्याने 'स्वच्छता मॉनिटर' नावाचा एक प्रकल्प कर्जावर केला होता. या प्रकल्पाचे पैसे सरकारकडून मिळाले नाहीत आणि त्याला कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. या आर्थिक नुकसानीकडे आणि आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी त्याने हे कृत्य केल्याचे समोर आले आहे. दरम्यान, मुलांची सुटका झाल्यानंतर त्यांना आणि पालकांना पवई पोलीस स्टेशनमध्ये नेण्यात आले आणि त्याठिकाणी त्यांचे जबाब नोंदवण्यात आले. मुले घाबरलेली असली तरी सुरक्षित आहेत, असे पालकांनी सांगितले.

----------

### रुपाली चाकणकरांचे

नाराजी व्यक्त केली. त्यावेळी अजित पवारांनी याबाबत मी त्यांना विचारणार असल्याचे सांगितले. तसेच मुख्यमंत्र्यांशी देखील या प्रश्नावर चर्चा करण्याचे आश्वासन कुटुंबीयांना दिले. अजित पवार म्हणाले, रूपाली चाकणकर यांच्या मताशी आम्ही सहमत नाहीत. या संदर्भात रूपाली चाकणकर यांना विचारणा करणार आहे. त्यांच्या मताचे कोणीही आम्ही समर्थन करणार नाही. तसेच त्यांनी असे का केले याचा जाबदेखील विचारणार असल्याचे अजित पवार यावेळी म्हणाले. मुळची बीड जिल्ह्यातील रहिवाशी असलेल्या डॉक्टर तरूणीने फलटणमध्ये आत्महत्येपूर्वी आपल्या तळहातावर आत्महत्येचे कारण लिहून ठेवले होते. पीएसआय गोपाळ बदनेने चार वेळा बलात्कार केल्याचा त्यात उल्लेख आहे. तर प्रशांत बनकरने मानसिक छळ केल्याचे तरुणीच्या हातावरील मजकुरात आढळून आले आहे. या दाव्यानंतर विरोधकांनी चाकणकरांवर सडकून टीका केली. तसेच महिला आयोगाच्या भूमिकेवर सवाल उपस्थित केले. मृत्यूनंतर त्या मुलीचे आयोगाकडून चारित्र्यहनन का ? पोलीस यंत्रणेवर संशय असताना त्यांनी दिलेले पुरावे का ग्राह्य धरावेत, असे सवालदेखील विरोधकांडून विचारले जात आहेत.

### चाकणकर यापुर्वीही वादात

महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकरांना यापूर्वीही टीकेचे धनी व्हावे लागले आहे. वैष्णवी हगवणे, तनिषा भिसे प्रकरणातही विरोधकांनी त्यांच्या भूमिकेवर सवाल उपस्थित केले होते. आता फलटण प्रकरणातही त्या विरोधकांच्या निशाण्यावर आल्या आहेत. त्यांच्या राजिनाम्याची मागणी विरोधकांकडून केली जात आहे. शिवाय जोगोजागी त्यांच्या विरोधात आंदोलन केले जात आहे. यामुळे आपल्या कार्याने वादग्रस्त ठरलेल्या रूपाली चाकणकर यांचा आता राजिनामा घेतला जाण्याची शक्यता आहे.

--------

### सीबीएसई दहावी-बारावी

कालावधी मिळणार आहे. सीबीएसई बोर्डाच्या अधिकृत वेबसाइटवर विद्यार्थ्यांना विषयानुसार परीक्षेचे वेळापत्रक पाहता येईल. तसेच, येथून विद्यार्थी हे वेळापत्रक डाऊनलोडही करू शकतात.

---------

### आष्टीच्या शेतकरी सूतगिरणीच्या ७२५७ कोटीच्या

असल्याचेही बोलले जात आहे. राज्य शासनाच्या सहकार पणन व वस्त्र उद्योग विभागाने शासन निर्णय क्रमांक १५ २४ नुसार २९ ऑक्टोबर रोजी जाहीर केलेल्या आदेशामध्ये सुधारित प्रकल्प अहवालास मान्यता दिली आहे. शेतकरी सहकारी सूतगिरणी ही जुनी आहे मात्र अद्याप या ठिकाणी काहीच काम झालेले नव्हते यासाठी आता राज्य शासनाने निर्णय घेत या सूतगिरणीसाठी ७२५७.८४ लाख रुपयाचे सुधारित मान्यता दिली आहे. त्यामध्ये पाच टक्के सभासद भाग भांडवल, ३६२ कोटी शासकीय भाग भांडवल, ३२६६ कोटी दीर्घ मुदतीत कर्ज, असे एकूण ७२५७. ८४ कोटी यामध्ये या सूतगिरणीचा प्रकल्प किमतीच्या भागनिहाय तरतुदींचा तपशील देखील देण्यात आला आहे. त्या मर्यादित या सूतगिरणीने खर्च करणे सूतगिरणीच्या संचालक मंडळास बंधनकारक राहील. प्रामुख्याने जमीन व जमीन सुधारणा यासाठी १७२ कोटी फॅक्टरी व इमारत आणि इतर बांधकामासाठी १९० कोटी रुपये मशनरी इतर मालमत्ता स्टोअर्स आदी साहित्य मिळून ७२५७ कोटी रुपयांच्या प्रकल्पास मान्यता दिली असल्याचे कार्यासन अधिकारी चित्रा बिषण यांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे. प्रामुख्याने ही संस्था माजी आमदार भीमराव धोंडे यांची असून, मध्यंतरी त्यांच्या राजकीय हालचाली पाहता आणि आता काढलेला शासन आदेशामुळे धोंडे यांना हा बुस्टर असावा अशी देखील चर्चा होत आहे.

--------

### कवडगाव संतप्त ग्रामस्थांचे पाण्याच्या

फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणाचा एसआयटीमार्फत तपास व्हावा या मागणीसाठी महिला डॉक्टर यांच्या कवडगाव येथील ग्रामस्थ आक्रमक झाले ग्रामस्थांनी काल सकाळी पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन केले. यावेळी ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रूपाली ताई ठोंबरे यांनी मृत महिला डॉक्टरच्या कुटुंबीयांची भेट घेतली त्यांनी आंदोलकांशी संवाद साधून आंदोलकांना खाली उतरण्याचे आवाहन केले. आपल्या गावात नाही, तर फलटणला जाऊन आपण तिथे बोलू. त्रास झाला पाहिजे, असे सुषमा अंधारे ज्यांनी आपल्याला त्रास दिलाय, त्यांना म्हणाल्या. बीडच्या वडवणी तालुक्यातील महिला डॉक्टरच्या गावातील नागरिकांकडून पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन सुरू करण्यात आले. त्यात आंदोलना दरम्यान आंदोलक आक्रमक झाले आणि त्यांनी पाण्याच्या टाकीवरून खाली उडी मारण्याचा प्रयत्न केला. आमची लेक गेली तरी यांना जाग येत नाही.. तिला न्याय मिळत नाही अशा संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केले जात आहे. कवडगाव येथील ग्रामस्थ व तरुणांनी पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन सुरु केल्याने या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी यांनी एस आय टि स्थापना करावी अशी मागणी लेखी स्वरूपात मान्य होईपर्यंत हे आंदोलन मागे घेण्यात येणार नाही असा पवित्रा घेतला यावेळी आंदोलन स्थळी नायब तहसीलदार यांनी मध्यस्थी करून विभागीय अधिकारी माजलगाव स्वामी, तहसिलदार महिंद्रकर यांच्याशी आंदोलकांचे बोलणे करून दिले व मागणी मुख्यमंत्री यांना कळविण्यात येईल असे सांगितले.तरी ग्रामस्थांनी पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईल आंदोलन सुरू केल्याने तालुका प्रशासनाची धावपळ झाल्याचे पहावयास मिळाले.

-----------

### फटाक्यांच्या आवाजाने

हवेतील प्रदूषण वाढते. यंदाही दिवाळीत कोट्यावधी रुपयांच्या फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. यामुळे मोठ्या प्रमाणात धूर निर्माण होऊन वायुप्रदूषण वाढल्याने सर्वाधिक त्रास दम्याच्या रुग्णांना झाला. त्यांचा श्वास कोंडला गेल्याने उपचारासाठी रुग्णालयात धाव घ्यावी लागली.

--------

### बीडमध्ये कॅनरा बॅक फोडली:लाखोची

या महामार्गावरील पाली येथे उड्डांन पुलाच्या बाजुला असलेल्या कॅनारा बँकेच्या शाखेत चोरट्यांनी मोठा डल्ला मारला. बँकेच्या पाठीमागील भिंत तोंडून आत प्रवेश केला. आतील तिजोरी गॅस कटरच्या सहायाने उघडून त्यांतील लाखो रूपयाची रक्कम लंपास केली. सकाळी घटनेची माहिती मिळाल्यानंतर एलसीबीच्या पथकाने पाहणी केली. त्यानुसार त्यांनी तपासची चक्र फिरवली या प्रकरणी शाखा अधिकारी यांच्या फिर्यादीवरून बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

--------------

cmyk



## थोडक्यात...



### गजानन विद्यालय लऊळ येथे ३२ वर्षानंतर पार पडला स्नेहमिलन मेळावा

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील गजानन विद्यालय लऊळ येथे ३२ वर्षा नंतर स्नेह मिलन मेळावा पार पडला. १९९२-९३ बॅच ला शिकवणारे जाधव सर, देशमुख सर, महाजन सर, शिंगाडे सर, संस्थेच्या अध्यक्षा राजूबाई शिंदे, शाळेचे सध्याचे मुख्याध्यापक घंटाजी सर, यांचा उपस्थितीत स्नेह मिलन मेळावा पार पडला.स्वागत गीत अरविंद लोंढे यांनी गायले.बने चाहे दुश्मन जमाना हमारा सलामत रहे दोस्ताना हमारा या गीताचे गायन देडे सर,डावरे सर,लोटे सर,यांनी केले. तसेच ताई कविताचे गायन अशोक राठोड सर,यांनी केले तर मैत्री कविताचे गायन प्रा. लक्ष्मण गिरी यांनी केले.तसेच शेटे, डॉ.कुलकर्णी व इतर वर्गमित्र यांनी मैत्री या विषयावर आपापले मनोगत व्यक्त केले.जाधव सर,यांनी औक्षवंत व निरोगी राहण्यासाठी रोज सकाळी व्यायाम करणे आहारावर नियंत्रण ठेवणे रोज किमान किमान पाच ते सहा किलोमीटर चालणे अशा आरोग्य विषयी काही टिप्स सांगितल्या. व सर्वांची शंभरी पार व्हावी सर्वांच्या हातून विद्यार्थ्यांची, समाजाची, दीनदुबळ्यांची, सेवा घडो अशा शुभेच्छा दिल्या. व सर्वांचे आभार मानले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड. देडे यांनी केले.कार्यक्रमाचे नियोजन लोडे, अशोक राठोड, उघडे,यांनी केले.

### मराठवाडा पदवीधर मतदार संघातील पदवीधरांनी नाव नोंदणी करावी -वाघमोडे

बीड । प्रतिनिधी

मराठवाडा विभाग पदवीधर मतदारसंघात पदवीधर मतदार नाव नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात बीड जिल्हयातील पदवीधरांनी



नाव नोंदणी करावी यासाठी काही अडचण आल्यास संपर्क करावा, असे आवाहन अमर वाघमोडे यांनी केले आहे. प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे, मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या सन २०२६ मध्ये होणाऱ्या निवडणुकीसाठी मतदारयादी तयार करण्याचा कालबध्द कार्यक्रम निवडणुक आयोगाने घोषित केला आहे. पदवीधर मतदारसंघाच्या प्रत्येक निवडणुकीत मतदारांची नव्याने नावनोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार

मराठवाड्यात पदवीधर मतदार नावनोंदणी अभियान हाती घेतले आहे. बीड जिल्हयात देखील हे अभियान यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे. यासाठी सर्व पदवीधरांनी या अभियानात सहभागी होणे आवश्यक आहे. पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मतदार यादी दरवेळी नव्याने तयार करण्यात येते. त्यामुळे गतनिवडणुकीमध्ये मतदार नोंदणी केली असेल तरीही नोंदणी करणे आवश्यक आहे. नवीन नोंदणी करिता १ नोव्हेंबर २०२२ पुर्वीचा पदवीधर असे आवश्यक आहे.



### पत्रकार अनिल महाजन लोकसंसद जनप्रेरणा शिखर पुरस्काराने सन्मानित

किल्लेधारूर । प्रतिनिधी

समाजात प्रेरणा व सकारात्मक बदल घडविणाऱ्या किल्ले धारूर येथील पत्रकार अनिल महाजन यांना मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात आयोजित सोहळ्यात "लोकसंसद जनप्रेरणा शिखर पुरस्कार २०२५" ने सन्मानित करण्यात आले. हा राज्यस्तरीय कार्यक्रम क्रांती ग्राम विकास संस्था व विश्वनायक लोकसंसद फाउंडेशन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. अध्यक्षस्थानी सुरेश यादव होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. ओमप्रकाश शेटे, अभिनेत्री अलका कुबल, डॉ. निशिगंधा वाड, आणि अभिनेते रोहित कोकाटे उपस्थित होते.अनिल महाजन यांना शैक्षणिक व पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्य, समाजजागृती आणि जनसंपर्कातील कार्यतत्परतेबद्दल हा सन्मान मिळाला. या सन्मानामुळे त्यांच्या कार्याला नवचैतन्य आणि प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# राधा ही एक महान भावना आहे - साध्वी भारतीजी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथे सुरू असलेल्या श्रीमद्? देवी भागवत महापुराण ज्ञानयज्ञ कथेच्या सहाव्या दिवसाची कथा सांगताना कथाव्यास साध्वी अदिती भारतीजीनी दुर्वासा ऋषींच्या शापामुळे इंद्राच्या संपत्तीचे नुकसान, स्वर्गातून देवी लक्ष्मीचे गायब होणे आणि समुद्रमंथनातून देवी सुरभीदेवी आणि देवी महालक्ष्मी यांचे प्रकटीकरण झाल्याच्या कथा सांगितल्या. सहाव्या दिवसाची कहाणी गोदा देवीच्या जीवनकथेच्या कथनाने सुरू झाली ज्यामध्ये देवी राधेचा गौरव करण्यात आला.





कथेचे प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प. किशन महाराज पवार अध्यक्ष मुकुंदराज महाराज मंदिर देवस्थान, अर्जुन वाहामारे तालुका प्रमुख शिवसेना (शिंदे गट), एड. मकरंद पत्की अध्यक्ष दीनदयाल नागरी सहकारी बँक, गणेश जाधव. शहर प्रमुख शिव सेना शिंदे गट, श्री व सौ. अश्विनी महादेव साळुंके संचालक महेशचंद्र मंगल कार्यालय जवळगाव, पूनमचंद परदेशी ज्येष्ठ पत्रकार राकेश मोरे महाविद्यालयीन संघ चालक,महादेव गायकवाड ग्रामीण तालुका संघ प्रमुख यांनी दीप प्रज्वलनाचा विधी केला . या भव्य कार्यक्रमाद्वारे कथाव्यासजी आईच्या विविध लीलांचे वर्णन केले. श्री राधेचा महिमा वर्णन करताना साध्वीजी म्हणाल्या की राधा ही श्रीकृष्णाची आल्हादिनी शक्ती आहे. श्री राधा जी केवळ कोणताही काळ किंवा जगाशी बांधलेले एक पात्र नाही तर त्या एक महान भावना आहे जी प्रत्येक युगात भक्तांमध्ये प्रकट झाली आहे. मंगळवेढा मध्ये जन्मलेल्या कान्होपात्रा यांनी श्री राधा भावनाच अभिव्यक्त केला आहे. तिच्या जीवनकथेचे हृदयस्पर्शी वर्णन श्रवण करून भाविक भावनेने भारावून गेले.

समुद्रमंथनातून माता महालक्ष्मी प्रकटीकरण लीलाचे विश्लेषण करताना साध्वीजींनी भक्तांना पुरुषार्थाचा अर्थ समजावून सांगितला आणि धर्माच्या आवश्यकतेवर भर दिला. समुद्रमंथनाच्या गहन संदर्भाचा दाखला देत साध्वीजींनी आध्यात्मिक समृद्धीवर भर दिला. सामाजिक आणि वैयक्तिक समृद्धीचा आधार म्हणून त्याचे वर्णन करण्यात आले. या घटनेला जागतिक संदर्भाशी जोडताना साध्वीजी म्हणाल्या की या जगात भौतिक प्रगतीची शिडी चढत असताना प्रत्येक व्यवस्थेत अचानक बिघाड का दिसून येतो. याचे कारण समृद्धीचा आधार पैसा आहे?

कथेच्या शेवटच्या टप्प्यात साध्वीजींनी सर्वांना समाज आणि विश्व कल्याणाच्या उन्नतीसाठी काम करण्याची प्रेरणा दिली. यासाठी त्यांनी लोकांना त्यांचे तन, मन आणि धन उत्साहाने दान करण्यास प्रेरित केले. कथेच्या शेवटच्या टप्प्यात देवी महालक्ष्मी आणि भगवान विष्णू यांच्या संगीतमय विवाह सोहळ्यात भाविकांनी उत्साहाने सहभाग घेतला. या प्रसंगी पाहुणे आणि दिव्य ज्योती जाग्रति संस्थेचे प्रचारक स्वामीजी व साध्विजी तसेच सदस्य भक्तगण देखील उपस्थित होते

## स्थानिक स्वराज्य संस्थांचे आरक्षण जाहीर होताच उपळीत राजकीय चर्चेला उधाण

### ग्रामस्थांची मागणी विनायक शेळके यांना द्यावी उपळी पंचायत समितीची उमेदवारी

वडवणी प्रतिनिधी

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या जागांचे आरक्षण जाहीर होताच संपूर्ण तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. इच्छुक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आपापले मतदारसंघ गाठण्यास सुरुवात केली असून उपळी परिसरात या घडामोडींना विशेष वेग आला आहे.

उपळी जिल्हा परिषद मतदारसंघ इतर मागासवर्गीय आरक्षणासाठी राखीव ठरला असून पंचायत समितीचा मतदारसंघ खुल्या प्रवर्गासाठी जाहीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर उपळी ग्रामस्थांमध्ये आता आमदार प्रकाश सोळंके यांनी उपळीचे उपसरपंच विनायक शेळके यांना उमेदवारी द्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

उपळी हे सर्कलमधील महत्त्वाचे गाव असून आतापर्यंत या गावाला पंचायत समिती पातळीवर फारसे प्राधान्य मिळालेले नाही. परंतु या वेळी ग्रामस्थांनी शेळके यांच्यावर एकमताने विश्वास दाखवला आहे. विनायक शेळके हे सर्वसमावेशक कार्यशैलीसाठी ओळखले जातात. ते उच्चशिक्षित असून, सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन काम करणारे कार्यकर्ते आहेत. त्यांनी यापूर्वी पंचायत समितीची निवडणूकही लढवलेली असून या सर्कलमधील गावांमध्ये त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे.



या सर्व बाबींचा विचार करता, शेळके हे पंचायत समिती निवडणुकीत सक्षम उमेदवार ठरू शकतात, असा विश्वास स्थानिक जनतेत व्यक्त होत आहे. आमदार प्रकाश सोळंके यांनी यावेळी उपळीच्या जनतेला न्याय देत विनायक शेळके यांना संधी द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, प्रकाश सोळंके यांना दीर्घकाळ पाठिंबा देणाऱ्या उपळी ग्रामस्थांमध्ये असा प्रश्न उपस्थित होत आहे की, पंचवीस वर्षांचा राजकीय दुष्काळ संपवून या वेळी उपळीला सन्मानाची उमेदवारी मिळणार का?

## स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने तब्बल १८ वर्षांनी पुन्हा भेटले सर्व मित्र-मैत्रिणी

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील बोरगाव हायस्कूल बोरगाव येथील २००७-०८ मध्ये इयत्ता दहावी झालेल्या विद्यार्थ्यांचा सोशल मीडिया मार्फत एकत्र ग्रुप करण्यात आला. हा ग्रुप दोन महिन्यापूर्वी करण्यात आला आणि स्नेह संमेलनाची सुरुवात आणि चर्चा सत्राची येथून सुरुवात झाली. सर्व विद्यार्थ्यांच्या समन्वयाने तारीख फिक्स करण्यात आली. हा कार्यक्रम भाग्यलक्ष्मी लॉन्स गेवराई येथे २५/१०/२०२५ रोजी पार पडला यावेळी बोरगाव हायस्कूल बोरगाव येथील मुख्याध्यापक श्री घोडके सर व सर्व सहशिक्षक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती भाग्यश्री परजणे वर्गातीलच एका मैत्रिणीने नाव भूषवले तसेच




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाहूराव गाडे यांनी केले, कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्रीमती सोनिया काचुळे यांनी केले. आभार प्रदर्शन राहुल राऊत यांनी केले या कार्यक्रमाचे निमित्ताने सर्व मित्र मैत्रिणी एकत्र येऊन जीवनाचा उहापोह करण्यात आला. यावेळी सर्व शिक्षकांचा आदराधित्य करण्यात आले. सर्वांचे मनोगत व्यक्त करताना मन भारावून गेले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळेतील आठवणींना उजाळा देण्याचे काम झाले आणि वर्गातील सर्व मुलांच्या वतीने स्नेहसंमेलणाला आलेल्या सर्व मुलींना भाऊबीज निमित्ताने साड्या भेट देण्यात आल्याने सर्व शिक्षकांकडून या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले

पान ६ वरून...

### तालुक्यातील ४०

हिवरा पहाडी १, खांडे पारगाव २, लिंबा रुई २, मोरगाव २, सांगळवाडी दत्तनगर, खालापुरी १, बीडमधील इंद्रप्रस्थ कॉलनी, अंकुश नगर नरसोबा नगर, कागदीवेस, पंचशील नगर, शाहूनगर हनुमान नगर, अजीजपुरा, हिंगणी हवेली, म्हाळसजवळा क्र.२, म्हाळसजवळा अंतर्गत खाडे वस्ती, पिंपळनेर १, पिंपळनेर अंतर्गत बाभळवाडी, सिद्धेश्वर नगर, कुर्ला, दगडी शहाजनपुर, चांदेगाव, महाजनवाडी, कारेगव्हाण, चांदसवाडी, ससेवाडी, दवरवाडी, पिंपळगाव मोची या अंगणवाड्यांचा समावेश आहे. या निर्णयामुळे लहान बालकांच्या शिक्षण व संगोपनासाठी अधिक चांगले व आधुनिक वातावरण उपलब्ध होणार आहे. या उपक्रमाबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार, महिला व बालविकास मंत्री आदितीताई तटकरे यांचे आभार मानले असून, "या निर्णयामुळे बालविकासाचा दर्जा उंचावेल," असेही ते म्हणाले.

**आदर्श अंगणवाडीमध्ये रुपांतरण करणार**

स्मार्ट अंगणवाडी किटची किंमत १ लाख ६४ हजार ५४० रुपये असून खाजगी पुरवठादारामार्फत साहित्याचा पुरवठा व अंगणवाडीचे आदर्श अंगणवाडीमध्ये रुपांतरण करण्याचे कामकाज अंगणवाडी स्तरावर करण्यात यावे, यासाठी महिला व बालविकास विभागाने मान्यता दिली आहे.

### बच्चु कडु यांच्या आंदोलनाला

याचा धक्का घेऊन सरकारने मुख्यमंत्र्यांसोबत बैठक लावली आणि बैठकीत शेतकरी संघटनेने केलेल्या मागण्याबाबत चर्चा करू असे ठरवण्यात आले जर सरकारने मागण्या मान्य केल्या नाही तर महाराष्ट्रात तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा सर्व शेतकरी संघटनेच्या प्रमुखांनी दिलेला आहे.या आंदोलनात शिवाजी कुरे, अशोक डाके, कृष्णा सोळंके,पप्पू हिवरकर,अजय राऊत,विक्रम सोळंके,तुकाराम नावडकर,गणेश कदम,बाबा सर, अनिरुद्ध तात्या सोळंके,विकास थेटे,नितीन पवार,जनक तेलगड,बाळासाहेब तेलगड,वसंत पाटील,चंद्रकांत गाते,गणेश कुरे, मनोज जगताप, इत्यादी शेतकरी सहभागी होते

### अंबाजोगाईत कर्जाच्या

२५ हजारांच्या कर्जाची रक्कम व्याजासह ७० हजार झाल्याचे सांगून ती तातडीने देण्याची मागणी केली. त्यानंतर आरोपींनी शाहेद पठाण याला जबरदस्तीने मोटारसायकलवर बसवून अपहरण केले. नंतर शाहेदने वडिलांना कळविले की, आरोपींनी त्याला परळी बसस्थानकावर आणून पोलिसांचे फोन आल्याने सोडून दिले आहे.या घटनेवरून अरविंद गायकवाड व त्याचे चार साथीदार यांच्याविरुद्ध अपहरण, धमकी व जबरदस्ती केल्याचा गुन्हा अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## जि.प.,पं.स. व नगरपालिका निवडणुक लढवू इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांनी अर्ज करावेत - बजगुडे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे यांच्या सुचनेवरून व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन दादा सपकाळ, राज्यसभा खासदार रजनीताई अशोकराव पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस आदित्य पाटील यांच्या नेतृत्वाखाली आगामी होवु घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती व नगरपालिका निवडणुका काँग्रेस पक्ष स्वबळावर लढणार असुन महाविकास आघाडीतील काही घटक पक्षाच्या इच्छुक उमेदवाराकडून अमुक जागा अमुक पक्षाची असल्याचे दर्शवुन जनतेची



दिशाभुल केली जात आहे. अद्याप महाविकास आघाडीची कसल्याही प्रकारची चर्चा झालेली नसुन आघाडीचा कुठलाही प्रस्ताव मिळालेला नाही त्यामुळे कुठलीही जागा कुठल्याही पक्षाला आघाडीत सुटलेली नसुन काँग्रेस पक्षाकडे सर्व जागेवर लढण्यासाठी अतिशय चांगली उमेदवार इच्छुक आहेत. त्यामुळे काँग्रेस सर्व जागा स्वबळावर लढणार असुन काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी बीड तालुका व शहर कार्यालयात उमेदवारी करीता अर्ज करावेत असे आवाहन तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, नगराध्यक्ष व नगरसेवक पदाकरीता काँग्रेस पक्षाकडून निवडणुक लढवू इच्छित असलेल्या सर्वांनी दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ ते ०६ नोव्हेंबर २०२५ दरम्यान अर्ज जमा करावेत असे आवाहन बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे.




## शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी पाटोदा तालुका मराठी पत्रकार परिषद आली धावून

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांना फार्मल आयडी व केवायसी प्रक्रियेमुळे अनुदान मिळण्यात अडथळे येत असल्याने पाटोदा तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने तहसीलदार यांची भेट घेऊन या गंभीर प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली.शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचे लाभ वेळेवर मिळावेत, यासाठी केवायसी व फार्मल आयडी संदर्भातील तांत्रिक अडचणी दूर करून तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांकडे केली. तहसीलदार साहेबांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित विभागाशी समन्वय साधून शेतकऱ्यांचे प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

या वेळी पाटोदा तालुका मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष,उपाध्यक्ष, सचिव तसेच पत्रकार परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

## आंबेडकरांचा अवमान करणाऱ्यांना कायद्याने उत्तर दिल्याशिवाय शांत बसणार नाही -अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वारस व संविधानतज्ज्ञ मा.खा. ड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर हे देशातील प्रतिष्ठित संवैधानिक विचारवंत व जननेते आहेत.

तथापि, अलीकडील काळात काही असामाजिक प्रवृत्तीचे लोक फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स (ट्विटर) आणि इतर सामाजिक माध्यमांवर त्यांच्या विरोधात अक्षेपार्ह, खालच्या दर्जाचे, जातीय आणि असत्य विधान करून समाजात द्वेष, तिरस्कार आणि अशांती पसरविण्याचा प्रयत्न करत आहेत.अशा प्रकारच्या पोस्ट, कॉमेंट्स आणि व्हिडिओंनी केवळ एका व्यक्तीच्या सन्मानावर आघात होत नाही, तर भारतीय संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मर्यादांचे (अनुच्छेद १९(२)) उल्लंघन होते. परिणामी, समाजात जातीय वैमनस्य आणि सार्वजनिक शांततेचा भंग होण्याची शक्यता निर्माण होते.



संविधानिक व कायदेशीर तरतुदी अनुच्छेद १९(१)(र): अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार, अनुच्छेद १९(२): सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता आणि सन्मानाच्या रक्षणासाठी मर्यादा, अनुच्छेद २१: सन्मानाने जगण्याचा मूलभूत अधिकार भारतीय दंड संहिता (खझउ) कलम १५३-: जातीय, धार्मिक द्वेष पसरविणे, कलम २९५-: धार्मिक भावना दुखावणे, कलम ४९९, ५००: मानहानी, कलम ५०४: जाणूनबुजून अपमान करून शांततेचा भंग करणे, कलम ५०५(२): जातीय वा धार्मिक वैमनस्य वाढविणारी वक्तव्ये

माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० (खढ -लीं) कलम ६६-(संशोधित): अपमानास्पद वा खोटे संदेश प्रसारित करणे, कलम ६७: इलेक्ट्रॉनिक माध्यमातून अश्लील वा अपमानास्पद मजकूर प्रसारित करणे, कलम ६९-: सार्वजनिक सुव्यवस्थेला धोका निर्माण करणारी खाती अवरोधित करण्याची तरतूद

वंचित बहुजन आघाडीच्या मागण्या सोशल मीडियावरील अशा अकाउंट्सची चौकशी करून मा. प्रकाश आंबेडकर यांच्या विरोधात द्वेषपूर्ण मजकूर पोस्ट करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, संबंधितांच्या मोबाईल क्रमांक, ई-मेल, खझ अॅड्रेस व अकाउंट्सची तपासणी करण्यात यावी, अशा सर्व पोस्ट्स तात्काळ काढून टाकून, कलम १५३-, २९५-, ४९९, ५००, ५०४, ५०५(२) आणि खढ -लीं अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी, पुढील काळात अशा प्रकारची द्वेषपूर्ण कृत्ये होऊ नयेत म्हणून पोलीस विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. वंचित बहुजन आघाडीचा ठाम इशारा संविधानाचा, विचारांचा आणि नेत्यांच्या सन्मानाचा अपमान सहन केला जाणार नाही. संविधानविरोधी आणि द्वेष पसरविणाऱ्यांना कायद्यानेच उत्तर दिले जाईल.यावेळी सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे प्रशांत बोराडे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, ज्येष्ठ नेते डॉ. नितीन सोनवणे, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर, सचिन मेघडंबर, अर्जुन जंजाळ, लखन जोगदंड, संदीप जाधव, मिलिंद सरपते, आकाश जावळे, उमेश गुळवे, अनिल वीर, प्रकाश उजगरे, राजेशकुमार जोगदंड यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिक्षकांच्या दैनंदिन शालेय कामकाजातील विविध ऑनलाइन कामाचा भार कमी करावा -विजय रापतवार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासन आपल्या विविध शासकीय योजना राबविण्यासाठी ऑनलाइन पद्धतीच्या स्वरूपात विद्यार्थ्यांची व योजनांची माहिती ॲप् द्वारे शिक्षकांच्या कडून भरून घेत आहे. जिल्हा परिषद शाळा मध्ये कार्यरत असलेले शिक्षक दररोज ४० प्रकारची विविध प वापरत आहेत.**



दररोज शिक्षकांना विविध ऑनलाईन प्स लिंक अहवाल सर्वेक्षण, तसेच त्यांच्या प्रशिक्षना मध्येच व्यस्त रहावे लागत आहे. सर्व वेगवेगळे मिळून एकूण ४० प्स आहेत ज्यामध्ये शिक्षकांना विद्यार्थ्यांना विद्यार्जनाचे काम सोडून यामध्येच व्यस्त रहावे लागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ लागले आहे. हे ऑनलाइन काम करत असताना यांचे सर्व्हर कधी चालतं कधी चालतं नाही तर कधी कोणती तांत्रिक अडचण निर्माण होते आहे. त्यामुळे शिक्षक जवळपास दिवसभर यामध्येच व्यस्त असतात.व आपोआपच विद्यार्थ्यांना आपल्या शैक्षणिक नुकसानिस सामोरे जावे लागत आहे. ही बाब शासनाने गंभीर्याने लक्षात घेऊन शासनाने हे सर्व ४० प्स एकत्र करून शाळांच्या ऑनलाइन कामासाठी एकत्रित प्रणाली विकसित करून एकच प चालू करावे जेणेकरून शिक्षकांना कमी वेळेत हे सर्व ऑनलाईन कामे करता यावीत. जेणेकरून शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या विद्या ज्ञानार्जयाकडेही पुरेसा वेळ देता येईल . पर्यायाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. यावर शासनाने गंभीर्याने विचार करून यावर उचित अशी कार्यवाही करावी अशी मागणी शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार, उपाध्यक्ष पांडुरंग नरवडे व सचिव विष्णू सरवदे यांनी एका प्रसिद्धी पत्राद्वारे केली आहे.शिक्षकांना हाताळाव्या लागत असलेल्या विविध प्स मध्ये सरल, शालार्थ,मध्यान्ह भोजन, प्रेरणा, प्रेरणा डीबीटी,महाडीबीटी, दीक्षा रीड अलॉन्ग, निपुण प्लस, शारदा उल्हास भारत,समर्थ पोर्टल, विनोबा प, कर्मयोगी, हरितिमा, इको क्लब,एस आधार उमंग प, महास्कूल स्वच्छ सर्वेक्षण,फीट इंडिया, सूक्ष्म कवच, ज्ञान समीक्षा, परख अशा जवळपास एकूण ४० प्सवर शिक्षकाकडून दररोज हजेरी, सर्वेक्षण अहवाल आणि विविध शासकीय माहिती दररोज अनिवार्य पणे भरावी लागते.

विविध शासकीय व्हाट्सअप ग्रुप करून दिवसभर वेगवेगळे शासकीय परिपत्रके व आदेश त्यातच अनेक वेगवेगळ्या माहितीसाठी वेगवेगळ्या लिंक येतात त्यामुळे शिक्षक पूर्ण वेळ या ऑनलाईन काम व व्हाट्सअप ग्रुप मुळे मोबाईलवर व्यस्त असल्यासारखे असतात. त्यात या प्स चे सर्वर चालले नाही तर माहिती वेळेत गेली नाही म्हणून पुन्हा कारवाईची भीती असते. या तणावांमध्येच शिक्षक दिवसभर असतात या सर्व कामाचा परिणाम अध्यापनावर होतो आहे. त्यामुळे शासनाने हे सर्व प्स एकत्रित करून नवीन डिजिटल प्रणाली विकसित करावी व हवी असलेली माहिती आपोआप या पवरून वेगवेगळ्या योजनेसाठी स्वीकारली जाईल अशी काही व्यवस्था करावी जेणेकरून शिक्षकावरील या ऑनलाइन कामाचा ताण कमी होईल अशी मागणी शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाई च्या वतीने अध्यक्ष विजय रापतवार व त्यांच्या संपूर्ण प्रतिष्ठानच्या वतीने शासनाकडे केली आहे.

cmyk

# कपाशीसह सोयाबीन पिकांना मोठा फटका

## शेतकरी चिंतेत, पावसाचा जोर पुन्हा वाढला

संभाजीनगर : राज्याच्या काही भागात पावसानं उघडीप दिली असली तरी काही भागात मात्र, अद्यापही पाऊस पडत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अनेक भागात जोरदार पाऊस सुरु आहे. यामुळं राज्यातील शेतकरी चिंतेत आहे. विशेषत: या पावसामुळं कापूस आणि सोयाबीन पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

मराठवाड्यासह विदर्भातील जिल्ह्यात विविध भागात पावसाने जोरदार हजेरी लावली. ग्रामीण भागात पावसाने गंजी लावलेल्या सोयाबीन आणि कापूस पिकाचे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांचा कापूस वेचणीला आणि सोयाबीन सोंगणीला सुरुवात झाल्याने पडत असलेला पाऊस शेतकऱ्यांसाठी नुकसानीचा ठरत आहे. आधीच खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची अतोनात नुकसान झाले आहे. यात आता पिके काढणीच्या वेळेस होत असलेल्या पावसामुळे हाती येत असलेले पिकांचे नुकसान होत आहे. आधीच शेतकरी अतिवृष्टीने



आर्थिक संकटात सापडला असताना आता पुन्हा पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी हतबल झाला आहे. दरम्यान, राज्याच्या काही भागात तुरळक पाऊस पडेल असा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. मराठवाड्यात संभाजीनगर, बीड, लातूर, परभणी, नांदेड, जालना या जिल्ह्यात पुन्हा अतिवृष्टीसारखा पाऊस पडला आहे. या पावसाने मांजरा, रेणा आणि तावरजा नद्यांच्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे. शेतकऱ्यांचे सोयाबीन वाहून गेले आहे. लातूर, औसा, रेणापूर आणि निलंगा तालुक्यात ठिकठिकाणी मुसळधार सरी कोसळल्या. या पावसामुळे नदी, नाले आणि ओढे भरून वाहू लागले आहे. रात्रभर झालेल्या पावसामुळे अनेक शेतकऱ्यांच्या सोयाबीनच्या गंजी पाण्यात वाहून गेल्या. काही ठिकाणी काढणीच्या अवस्थेतील पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. मागील महिन्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना या पावसाने पुन्हा एकदा मोठा फटका बसला आहे. हवेत गारवा निर्माण झाला असला तरी शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंता स्पष्ट दिसत आहे. प्रशासनाकडून नुकसानग्रस्त भागाचा पंचनामा करून मदत मिळावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८६४ : नेवाडा हे अमेरिकेचे ३६ वे राज्य बनले.
१८७६ : भारतात आलेल्या महाभयानक चक्रीवादळात २,००,००० पेक्षा अधिक व्यक्ती ठार
१८८० : धनत्रयोदशी (आश्विन वद्य त्रयोदशी) च्या दिवशी पुण्यातील आनंदोद्भव थिएटरमधे किर्लोस्करांच्या 'संगीत शाकुंतल' या नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
१९२० : नारायण मल्हार जोशी, लाला लजपतराय व इतर काही जणांनी ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसची स्थापना केली. लाला लजपतराय पहिले अध्यक्ष बनले.
१९४१ : 'माऊंट रशमोअर' या स्मारकाचे बांधकाम पूर्ण झाले.
१९६६ : दिल्ली उच्च न्यायालयाची स्थापना
१९६६ : प्रसिद्ध भारतीय जलतरणपटू मिहीर सेन यांनी पनामा कालवा पोहून पार केला.
१९८४ : पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्याच अंगरक्षकांकडून हत्या
१९८४ : भारताचे ६ वे पंतप्रधान म्हणून राजीव गांधी यांनी सूत्रे हाती घेतली.
२०११ : जागतिक लोकसंख्या सात अब्जांपर्यंत पोचली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस


१३९१ : एडवर्ड पोर्तुगालचा राजा (मृत्यू: ९ सप्टेंबर १४३८)
१८९७ : चीन गणराज्य (तैवान) चे पहिले पंतप्रधान चियांग काई-शेक यांचा जन्म. (मृत्यू: ५ एप्रिल १९७५)
१८९५ : सी. के. नायडू क्रिकेटपटू (मृत्यू: १४ नोव्हेंबर १९६७)
१८७५ : सरदार वल्लभभाई पटेल स्वातंत्र्य सेनानी, स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान व पहिले गृहमंत्री, भारताचे लोहपुरुष, भारतरत्न (मरणोत्तर १९९१) (मृत्यू: १५ डिसेंबर १९५०)
१९६१ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व माजी केंद्रीय क्रीडा व युवा कार्यमंत्री तसचं, आसाम राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री सेर्बानंद सोनोवाल यांचा जन्मदिन.
१९२२ : कंबोडिया देशाचे पहिले पंतप्रधान नॉरदॉम सिहानोक यांचा जन्म. (मृत्यू: १५ ऑक्टोबर २०१२)
१९४६ : रामनाथ पारकर क्रिकेटपटू (मृत्यू: ११ ऑगस्ट १९९९)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८३ : मूळशंकर करसनदास तिवारी तथा स्वामी दयानंद सरस्वती संस्कृत विद्वान आणि आर्य समाजाचे संस्थापक (जन्म: १२ फेब्रुवारी १८२४ तनकारा, मोर्वी, राजकोट, गुजरात)
१९२९ : भारतीय-इंग्लिश अभिनेते नॉर्मन प्रिचर्ड यांचे निधन. (जन्म: २३ जून १८७७)
१९७५ : सचिन देव बर्मन संगीतकार व गायक (जन्म: १ आक्टोबर १९०६)
१९८४ : भारताच्या ३ र्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्याच अंगरक्षकांनी गोळ्या झाडुन हत्या केली. (जन्म: १९ नोव्हेंबर १९१७)
१९८६ : आनंदीबाई शिर्के लेखिका, बालसाहित्यिका (जन्म: ३ जून १८९२)
२००१ : प्रसिद्ध भारतीय मुत्सद्दी आणि भारताचे अमेरिकेतील राजदूत तसचं, भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांचे पुतणे ब्रज कुमार नेहरू यांचे निधन.
२००५ : अमृता प्रीतम पंजाबी भाषेतील प्रतिथयश लेखिका आणि कवयित्री. त्यांच्या 'कागज ते कॅनव्हास' या कवितासंग्रहासाठी त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार (१९८१) देण्यात आला. 'रसीदी टिकट' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. (जन्म: ३१ ऑगस्ट १९१९)
२००९ : सुमती गुप्ते मराठीत तमाशाप्रधान चित्रपटांची चलती असताना पडद्यावर केवळ सोज्वळ नायिका रंगवून आपल्या सहजसुंदर अभिनयाची मोहोर उमटवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री.

## अकोल्यातील शेतकऱ्यांची सरकारकडून थट्टा

### पीकविमा योजनेचे मिळाले ३, ५ आणि ८ रुपये, शेतकऱ्यांनी पैसे केले परत




अकोला : आधीच अतिवृष्टीच्या अस्मानी संकटात सापडलेला अकोला जिल्ह्यातील शेतकरी आता सरकारी व्यवस्थेच्या संवेदनाशून्य सुल्तानी संकटात सापडला आहे. अकोला जिल्ह्यातील दिनोडा गावातील शेतकऱ्यांच्या माथी फक्त ३, ५, ८ आणि २१ रुपयांच्या मदतीचे धनादेश मारण्यात आले आहेत. पंतप्रधान पीक विमा योजनेतून शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचे हे पैसे मिळाले आहेत. सरकार आणि प्रशासनाने यातून आपली थट्टा केल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी नुकसानीपोटी मिळालेले पिक विम्याचे पैसे अकोला जिल्हाधिकाऱ्यांकडे परत केले आहेत.

पंतप्रधान पीक विमा योजनेंतर्गत शेतकऱ्यांना मदतीचे धनादेश मिळाले आहेत. शेतकऱ्यांना पिक विमा योजनेअंतर्गत मिळालेली मदत ही तुटपुंजी व अपमानास्पद असल्याचे सांगत या शेतकऱ्यांनी हे धनादेश अकोला जिल्हाधिकाऱ्यांकडे परत केले. जवळपास २० ते २५ शेतकऱ्यांनीधनादेश सरकारकडे परत केले. शासनाने आता तरी शेतकऱ्यांची थट्टा करणे थांबवावे, अशी विनंती या शेतकऱ्यांनी सरकारकडे केली आहे. काँग्रेसनेही यावर जोरदार टीका करीत सरकार असंवेदनशील असल्याच म्हटलं आहे. पीक विमा ही एक योजना आहे जी नैसर्गिक आपत्तींमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देते. महाराष्ट्रात ही योजना प्रधानमंत्री पिक विमा योजना म्हणून राबवली जाते. ज्यामध्ये केंद्र आणि राज्य सरकार मिळून विमा हप्ता भरतात. नवीन नियमांनुसार, काही पिकांसाठी विमा हप्त्याचे दर बदलले आहेत आणि पीक पाहणी बंधनकारक केली आहे. महाराष्ट्रात २०१६ च्या खरिप हंगामापासून प्रधानमंत्री पीक विमा योजना राबवण्यात येते. नैसर्गिक आपत्तींमुळे शेतातील पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत नुकसान भरपाई दिली जाते. महाराष्ट्र सरकारने २०२३ मध्ये केवळ १ रुपया भरून प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्याची सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिली. तिलाच १ रुपयात पीक विमा योजना असं म्हटलं जाऊ लागलं. पण सध्या १ रुपयात पिक विमा बंद करण्यात आला आहे.

## 'या' जातीच्या मेंढ्या वर्षातून ६ ते ८ कोकरांना देतात जन्म

मांस तसेच लोकर व्यवसाय करण्यासाठी देशात बहुतेकजण आता मेंढ्यापालन व्यवसायाकडे वळलेले आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात हा व्यवसाय लोकप्रिय होत आहे, कारण त्यात कमी खर्चात जास्त नफा मिळतो. तसेच मांसाबरोबरच लोकरीलाही बाजारात मोठी मागणी आहे. विशेष म्हणजे मेंढीपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध राज्यांतील सरकारे शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देत आहेत. मात्र असे असतानाही केवळ सुधारित जातींची माहिती नसल्यामुळे बहुतेक मेंढीपालकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

अविशान मेंढीची प्रगत जात : 'अविशान' ही मेंढ्यांची प्रगत जात असून त्याचे वजन खूप वेगाने वाढते. या जातीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते एकाच वेळी ३ ते ४ कोकरांना जन्म देते. त्याचबरोबर 'अविशान' जातीच्या मेंढ्या वर्षातून दोनदा गर्भधारणा करतात. म्हणजेच ती एका वर्षात ६ ते ८ मुलांना जन्म देऊ शकते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी 'अविशान' जातीच्या मेंढ्या पाळल्यास त्यांना मोठा नफा मिळेल. ते मांस तसेच लोकर मोठ्या प्रमाणावर विकू शकतात.

अविशान मेंढ्यांचा इतिहास : अविशान मेंढ्यांचा क्लोन तयार करण्यासाठी शास्त्रज्ञांना खूप मेहनत घ्यावी लागली. १९९७ मध्ये पश्चिम बंगालमधील सुंदरबन येथून



गारोल जातीच्या मेंढ्या आणण्यात आल्या. यानंतर मालपुरा येथील मेंढ्यांसह या जातीचा क्रॉसिंग करून क्लोन तयार करण्यात आला. परंतु शास्त्रज्ञांना पूर्ण यश मिळाले नाही. कारण या मेंढ्यांच्या जातीचा मृत्यूदर जास्त होता. शिवाय दूध देण्याची क्षमताही कमी होती. यानंतर गुजरातच्या पाटणवाडी जातीच्या मेंढ्या मालपुरा येथील मेंढ्यांसह क्रॉस करण्यात आल्या. मग मेंढीची प्रगत जात "अविशान" जन्माला आली. हे सामान्य जातीच्या मेंढ्यांपेक्षा जास्त दूध देते. शिवाय, त्याची प्रजनन क्षमता देखील जास्त आहे. वर्षातून दोनदा गर्भधारणा होते.

केवळ ५ टक्के मृत्युदर : अविशान कोकरू इतर जातीच्या मेंढ्यांपेक्षा ३० टक्के वेगाने वाढतात. कोकरे जन्मानंतर लगेचच विक्रीसाठी तयार होतात, त्यामुळे शेतकऱ्यांना कमी खर्च येतो. सध्या उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, राजस्थानसह अनेक राज्यांतील शेतकरी अविशान मेंढ्या मोठ्या प्रमाणावर पाळत आहेत. या मेंढ्यांच्या मृत्यूचे प्रमाण केवळ ५ टक्के आहे. मांसासाठी ३ महिन्यांचे कोकरू विकता शकता. एक कोकरू साधारणपणे २५०० रुपयांना विकले जाते. जर तुम्ही ५० मेंढ्यांसह अविशान शेती सुरू केली असेल तर तुम्ही एका वर्षात किमान २०० कोकरू विकू शकता.

## रब्बी पिकांच्या व्यवस्थापनाबाबत मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी तज्ज्ञांचा सल्ला

रब्बी हंगामाची लागवड आता लवकरच सुरु होत आहे. तर काही पिकात आंतरमशागतीची कामे सुरु आहेत. अगोदर लागवड झालेल्या काही पिकांवर किडी आणि रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सध्याच्या परिस्थितीत विविध पिकांचे नियोजन कसे करावे यासाठी कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांनी खास मराठवाड्याच्या शेतकऱ्यांसाठी कृषी सल्ला दिला आहे.

रबी पिकांसाठी कृषी तज्ज्ञांच्या शिफारशी : ऊस लागवड - पूर्व हंगामी उसाची लागवड लवकरात लवकर संपवावी. ऊस लागवड करतांना ३० किलो नत्र, ८५ किलो स्फुरद व ८५ किलो पालाश (३२७ किलो १०:२६:२६ किंवा १८५ किलो डायअमोनियम फॉस्फेट + १४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश किंवा ६५ किलो युरिया + ५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट + १४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रति हेक्टरी खतमात्रा द्यावी. ऊस पिकावर खोड किडीचा ०प्रादुर्भाव दिसून येत असल्यास व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २० % २५ मिली किंवा क्लोरॅट्रानोलीप्रोल १८.५% ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ऊस पिकावर पांढऱ्या माशीसाठी डायमिथोएट ३० % ३६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

हळद - हळद पिकात कंदमाशीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी १५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५% २० मिली किंवा डायमिथोएट ३० % १५ मिली प्रति




१० लिटर पाण्यात मिसळून आलटून-पालटून फवारणी करावी. (हळद पिकावर केंद्रीय किटकनाशक मंडळातर्फे लेबल क्लेम नसल्यामूळे विद्यापिठ शिफारशीत संशोधनाचे निष्कर्ष दिले आहेत). हळदीचे उघडे पडलेल कंद मातीने झाकून घ्यावेत. हळद पिकात आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. हळदीच्या पानावरील ठिपके / करपा रोग याच्या व्यवस्थापनासाठी अझोक्सिस्ट्रॉबिन १८.२% + डायफेनकोनॅझोल ११.४% (पुर्वमिश्रित बुरशीनाशक) १० मिली + ५ मिली स्टीकरसह प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

हरभरा, करडई, ज्वारी - जोमदार वाढीसाठी हरभरा पीक सुरुवातीपासूनच तण विरहीत ठेवणे आवश्यक आहे. पीक २० ते २५ दिवसाचे असतांना पहिली कोळपणी करावी. मागील काही दिवसात किमान तापमानात झालेल्या घटीमूळे, वेळेवर लागवड केलेल्या करडई पिकात माव्याचा प्रादुर्भाव दिसून येत आहे, व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३०% १३ मिली किंवा असिफेट ७५% १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. करडई पिकात तणांच्या व्यवस्थापनासाठी पेरणीनंतर २५ ते ५० दिवसापर्यंत एक ते दोन कोळपण्या व खुरपणी करून घ्यावी. लवकर पेरणी केलेल्या रब्बी ज्वारी पिकात लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वरील किटकनाशकांची आलटून पालटून पावसाची उघड बघून फवारणी करावी. फवारणी करत असतांना किटकनाशक पोंग्यात पडेल अशाप्रकारे फवारणी करावी.

फळबागेचे व्यवस्थापन : संत्रा/मोसंबी बागेत फळवाढीसाठी ००:००:५० १५ ग्रॅम प्रति लिटर तसेच जिब्रॅलिक ॲसिड १ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. संत्रा/मोसंबी बागेत आंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे व आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. डाळींब बागेत फळवाढीसाठी ००:००:५० १५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. डाळींब व चिकू बागेत आंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे व आवश्यकतेनूसार पाणी द्यावे.

## पावसामुळे आंबा हंगाम महिनाभर लांबणार



पुणे : लांबलेल्या पावसाचा आंबा हंगामावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे अद्याप आंबा कलमांना मोहर येण्याची कोणतीही चिन्हे दिसत नसल्याने आंबा हंगाम महिनाभर लांबणार हे निश्चित मानले जात आहे.

सप्टेंबरमध्ये पावसाचे प्रमाण कमी होताच ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासुन ऑक्टोबर हीट सुरू होते. त्यानंतर काहीशी थंडी सुरू होते. या कालावधीत पहिल्या टप्प्यातील आंबा मोहराला सुरुवात होते. या कालावधीत आलेला आंबा जानेवारीमध्ये ग्राहकांना चाखायला मिळतो. परंतु या वर्षी अद्याप पावसाची संततधार सुरू आहे. ऑक्टोबर संपत आला असला तरी पावसाच्या सरी सुरूच आहेत. दोन-चार दिवसांचा अपवाद वगळता सतत पाऊस पडत आहे. त्यामुळे आंबा कलमांना कुठेही मोहर फुटण्यास सुरुवात झालेली नाही. उलट पावसामुळे काही कलमांना पालवी फुटण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. याचा मोठा परिणाम आंबा हंगामावर होणार आहे. कोकणात पहिल्या टप्प्यातील आंबा हंगाम हा जानेवारी मध्यापासून किंवा अखेरीपासून सुरू होतो. विशेषतः समुद्रकिनाऱ्यालगतच्या बागांना ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासून मोहर येतो. परंतु या वर्षी आणखी पंधरा ते वीस दिवस मोहर फुटेल अशी कोणतीही शक्यता दिसून येत नाही. त्यामुळे या वर्षीचा आंबा हंगाम साधारणपणे महिना ते दीड महिना लांबण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे ग्राहकांना या वर्षी फेब्रुवारीपर्यंत आंब्याची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

cmyk



# वाळुची अवैध वाहतुक करणाऱ्या तस्करांना तडीपार करा -जिल्हाधिकारी

जालना । प्रतिनिधी

महसूल व पोलिस प्रशासनाने अवैध वाळू चोरी विरोधात संयुक्त कारवाई करावी. प्रत्येक तालुक्यातील अवैध वाळू वाहतूक असलेली ठिकाणे तहसीलदार व पोलिस विभागाने निश्चित करावे. अशा ठिकाणी सीसीटिव्ही लावण्याची कारवाई करण्यात यावी. तरी जिल्ह्यातील वाळुची अवैध वाहतूक करणाऱ्या तस्करांना तडीपार करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी विशेष बैठक पार पडली, यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, प्र.अपर जिल्हाधिकारी सरिता सुत्रावे, प्र.निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, जिल्हा खनिकर्म अधिकारी तुषार निकम यांच्यासह जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी,



उपविभागीय पोलिस अधिकारी, तहसीलदार आदि प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, जिल्ह्यातील वाळुची अवैध वाहतूक रोखण्यासाठी ड्रोनचा वापर करावा तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने जिल्ह्यात रस्त्यावर धावणाऱ्या विना क्रमांकाच्या ट्रॅक्टर, टिप्पर, ट्रक आणि हायवा यासह इतर वाहनावर तात्काळ कारवाई करावी.

तसेच तहसील कार्यालय व पोलिस ठाणे येथे दंडात्मक कार्यवाहीतील वसुली प्रलंबित असलेल्या वाहनांचा त्वरीत लिलाव करण्यात यावा. एमपीडीएम कायद्याचा वापर कमी होत असल्याने अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांवर दाखल गुन्ह्यांच्या अनुषंगाने स्थानबध्दता होण्यासाठी कारवाई करावी. वाळुची चोरी रोखण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाचा स्वतंत्र हेल्पलाईन क्रमांक लवकरच उपलब्ध करुन दिला जाणार असून त्यावर अचुक माहिती देवून अवैध वाळुची वाहतुक करणारे वाहन पकडले गेल्यास त्या व्यक्तीला ५ हजार रुपयांचे बक्षिसही दिले जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

## फूस लावून पळवून नेलेल्या पीडितेसह आरोपी ताब्यात



जालना। प्रतिनिधी

फूस लावून पळून नेलेल्या पीडितेसह आरोपीचा शोध घेण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला यश आले आहे. कक्षाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी दोघांना आव्हाळवाडी ता. हवेली जि.पुणे येथून ताब्यात घेतले आहे.

घनसावंगी पोलिस ठाण्यात दि. ११ जून २०२५ रोजी मुलगी बेपत्ता झाल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीचा तपास न लागल्याने पोलिस अधीक्षक अयजकुमार बंसल यांच्या आदेशाने या गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाकडे दि. १० सप्टेंबर २०२५ वर्ग करण्यात आला. शोध घेण्यासाठी गुप्त बातमीदार नेमले. आरोपी व पीडिता हे आव्हाळवाडी, ता. हवेली जि.पुणे येथे राहत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. या माहितीवरून आव्हाळवाडी येथे पथकाने कारवाई करत दोघांना ताब्यात घेतले. गुन्ह्यातील पीडित व आरोपीस पुढील तपास कामी घनसावंगी पोलिस स्टेशन येथे हजर करण्यात आले आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक अजय कुमार बंसल, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अ.मा.वा.प्र. कक्षाचे प्रभारी अधिकारी पोउपनि गणेश शिंदे, मपोउपनि दिपाली शिंदे, पोउपनि रवींद्र जोशी, पोउपनि संजय गवळी, पोहेका कृष्णा देठे पोहेकों सागर बाबीस्कर (स्थागुशा), महिला अंमलदार संगीता चव्हाण, पुष्पा पुष्पा खरटमल, र आरती साबळे, रेणुका राठोड व चालक पोलिस अंमलदार संजय कुलकर्णी यांनी केली.

## मानवी हक्क अभियानकडून विविध मागण्यांचे तहसीलदारांना निवेदन



घनसावंगी । प्रतिनिधी

मानवी हक्क अभियान राष्ट्रीय अध्यक्ष प्रा, डॉ, मिलिंद आवाड यांच्या नेतृत्वाखाली मानवी हक्क अभियान जालना जिल्हा अध्यक्ष अंकुश सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली तहसिलदार घनसावंगी यांच्या मार्फत मूख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. दलित, आदिवासी, गायरानधारक, निराधार, शेतकरी, शेतमजूर, भुमिहीन, ईमारत बांधकाम, ऊसतोड कामगार, वंचित घटक यांच्या विविध मागण्यासाठी निवेदन देण्यात आले. मानवी हक्क अभियान संघटनेच्यावतीने एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. गायरान धारक कसत असलेल्या गायरान जमिन नांवे करण्यात याव्यात तसेच घनसावंगी तालुक्यात सौर ऊर्जा प्रकल्प गायरान जमिनीमध्ये उभारण्यात येऊ नये, निराधार योजनेची २१ हजाराची अट रद्द करण्यात यावी, अतिवृष्टीमुळे झालेल्या पावसामुळे शेतीचे व पिकांचे मोठे नुकसान झाले त्यांना सरसगट ५० हजार रूपये हेक्टरी अनुदान देण्यात यावे, शेतकरी बरोबर गायरानधारक यांच्या जमिनीचे व शेतीचे नुकसान झाले आहे त्यांना मदत देण्यात यावी, ईमारत बांधकाम नविन फार्म ऑनलाइन करण्यासाठी ग्रामीण भागात ग्रामविकास अधिकारी यांची फॉर्मवर सही शिका घेणे बंधनकारक असल्यामुळे ही अट रद्द करण्यात यावी, सर्व आवास योजना घरकुल वरील बजेट वाढवून ५ लाख प्रति घरकुल करण्यात यावी. अंबड व घनसावंगी या दोन्ही तालुक्यांमध्ये आजून काही तहसिल कार्यालय, पंचायत समिती, कृषी कार्यालया मंधील कर्मचारी व अधिकारी यांचा समावेश आहे. यांची चौकशी करून सर्व दोषींवर फोजदारी स्वरुपाचे गुन्हे नोंद करण्यात यावेत. अशा मागण्याचा यात समावेश आहे. असे निवेदन जिल्हा अध्यक्ष अंकुश सोनवणे, जिल्हा उपाध्यक्ष अंबादास जाधव, तालुका यूवक सचिन विलास हिवाळे, अभियान गुढेकर, दता गुढेकर, हरिभाऊ गुढेकर, अशोक लालझरे, सर्जेराव सोनवणे, उतम सोनवणे, लहाणू सोनवणे, रमेश सोनवणे, जना सोनवणे, सुभाष सुतार, अर्जून उकांडे, अंबादास येडे, परमेश्वर वाहुळे, कृष्णा शेळके, राघोजी शेळके, एकनाथ शेळके, संतोष शेळके, राजाराम शेळके, जिजाबाई वाघमारे, पदमाबाई गुहेकर, विनायक साबळे आदिंनी निवेदन दिले आहे.

## महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम अंमलबजावणीसाठी मुदतवाढ

जालना । प्रतिनिधी

ालना जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दीअंतर्गत क्षेत्र वगळून उर्वरित ग्रामीण भागातील दि. ३१ डिसेंबर २०२० पूर्वी अस्तित्वात असलेले अनधिकृत भुखंड अनधिकृत भुखंडावरील बांधकाम नियमान्वित करण्यासाठी सहायक संचालक नगर रचना जालना यांच्याकडील नोंदणीकृत परवानाधारक आर्किटेक्ट इंजिनियर यांच्यामार्फत प्रस्ताव दाखल करण्यास दि. ३० जून, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली.

जालना जिल्ह्यातील नागरिकांनी जालना जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दीअंतर्गत क्षेत्र वगळून उर्वरित ग्रामीण भागातील दि. ३१ डिसेंबर २०२० पूर्वी अस्तित्वात असलेले अनधिकृत भुखंड अनधिकृत भुखंडावरील बांधकाम नियमान्वित करण्यासाठी दिनांक ३० जुन, २०२६ पुर्वी विहीत कागदपत्रासह प्रस्ताव गुंठेवारी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे दाखल करावे. तसेच उपरोक्त प्रमाणे मुदतीत प्रस्ताव दाखल केले नसल्यास किंवा गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्र न घेता अनाधिकृत भुखंडाची खरेदी-विक्री किंवा सदर झालेले बांधकाम हे अतिक्रमण समजण्यास येऊन उक्त अधिनियमातील कलम -७ (१) मधील तरतूदी अन्वये अशी अनधिकृत विनापरवाना बांधकामे पाडण्याची कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी.

## हर्षद बोराडे याचा अपघाती मृत्यू

मंठा । प्रतिनिधी



तालुक्यातील पाटोदा येथील हर्षद निरज बोराडे वय १७ वर्षे या विद्यार्थ्यांचा लातूर येथे अपघाती मृत्यू झाला. उपचार सुरू असतानाच त्याची प्राणज्योत मालवली. ही घटना २९ ऑक्टोंबर रोजी घडली.

मंठा बाजार समितीचे माजी सभापती अंकुशराव (आबा) बोराडे यांचा तो नातू होता. हर्षद हा लातूर येथे शिक्षण घेत होता. अशी माहिती निकटवर्तीयांनी दिली.

त्याच्या अपघाती मृत्यूने बोराडे कुटुंबीयावर शोककळा पसरली आहे. हर्षदवर पाटोदा येथे दि. ३० रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर, माजीमंत्री राजेश टोपे, माजी आमदार विजय भांबळे यांच्यासह पंचक्रोशीतील डॉक्टर, वकील, व्यापारी, विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नातेवाईक उपस्थित होते. त्याच्या पश्चात आई, वडील, एक बहिण, आजी, आजोबा असा मोठा परिवार आहे.

## नोकरी महोत्सव व स्वयंरोजगार मेळाव्यास प्रतिसाद

### आमदार राण जिगजितसिंह पाटील यांच्या संकल्पनेतून रोजगारांची संधी

धाराशिव। प्रतिनिधी

आमदार राण जिगजितसिंह पाटील यांच्या संकल्पनेतून धाराशिव शहरात आयोजित करण्यात आलेल्या नोकरी महोत्सव व स्वयंरोजगार मेळाव्यास मोठा प्रतिसाद मिळाला. राज्यातील ५० हून अधिक नामांकित कंपन्यांच्या उपस्थितीत दोन हजारहून अधिक उमेदवारांनी मुलाखती दिली. तब्बल ४७८ युवकांना नियुक्ती पत्र बहाल करण्यात आले आहे तर ५०३ युवकांना अंतिम मुलाखतीसाठी कंपनीत बोलावण्यात आले आहे. दर तीन महिन्याला असा महोत्सव आणि मेळावा घेण्यात येणार असून त्यामाध्यमातून स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे



आ. पाटील यांनी यावेळी सांगितले.

या मेळाव्यास २२०० हून अधिक इच्छुक उमेदवारांची उपस्थिती होती. तर ३,५०० पेक्षा जास्त उमेदवारांनी नोंदणी केली होती. नोंदणी केलेल्या उमेदवारांना येत्या वर्षभर त्यांच्या पात्रतेनुसार रोजगाराच्या संधीबाबत माहिती उपलब्ध करून दिली जाणार आहे. या महोत्सवात राज्यभरातील ५० हून अधिक नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला व उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. स्वतःचा व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी विविध शासकीय महामंडळांच्या योजनांची माहिती आणि मार्गदर्शन देखील या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आले होते. जिल्ह्यातील अतिवृष्टी आणि महापुराच्या अभूतपूर्व परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, तरुण-तरुणींच्या हाताला काम मिळावे, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात या हेतूने आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यापुढील काळातही अशा प्रकारचे नोकरी व स्वयंरोजगार महोत्सव मोठ्या प्रमाणात आयोजित करण्यात येणार आहे. तसेच ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांना पुढील वर्षभर त्यांच्या पात्रतेनुसार रोजगाराच्या संधीबाबत माहिती दिली जाणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमास माजी खा. सुधाकर शृंगारे, दत्ता कुलकर्णी, नितीन काळे, विकास बारकूल, शंतनु पायाळ, खंडेराव चौरे, अमित शिंदे, सुनील काकडे, अभय इंगळे, राहुल काकडे, सौ. अस्मिता कांबळे, प्रीती कदम, उषाताई येरकळ, विद्या माने, नीलकंठ पाटील आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोयगावात संतप्त शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयाला ठोकले कुलूप

संभाजीनगर। प्रतिनिधी

सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अद्याप शासनाकडून मदत किंवा कर्जमाफीची कोणतीही घोषणा न झाल्याने बुधवार (दि. २९) संतप्त शेतकऱ्यांनी सोयगाव तहसील कार्यालयाला कुलूप ठोकत प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. सकाळी साडेदहा वाजता सुरू झालेले हे आंदोलन तब्बल चार तास चालले असून दुपारी दोन वाजेपर्यंत तहसील कार्यालय बंद राहिले.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरू झालेल्या मोर्चात सुमारे पाचशे ते सहाशे शेतकऱ्यांनी शासनाविरोधात घोषणाबाजी करत थेट तहसील कार्यालय गाठले. त्यानंतर कार्यालयाच्या मुख्य दरवाजाला कुलूप ठोकून शेतकऱ्यांनी आपला



संताप व्यक्त केला. तालुक्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीमुळे शेतजमिनी, पिके व जनावरांचे प्रचंड नुकसान झाले. जळगाव जिल्ह्यातील इतर तालुक्यांना भरपाई मिळालेली असताना सोयगावच्या शेतकऱ्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. तहसीलदार कार्यालयात गैरहजेरीमुळे शेतकऱ्यांनी ङ्गतहसीलदार येईपर्यंत कुलूप न उघडण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे महसूल कर्मचाऱ्यांना बाहेरच बसून प्रतीक्षा करावी लागली. यामुळे तब्बल पाच तास तहसीलचे अधिकारी, कर्मचाऱ्यांना कार्यालयाबाहेर तातकळत उभे राहवे लागले. यामुळे तहसीलमध्ये कामानिमित्त तालुक्यातून आलेल्या नागरिकांचे कामे खोळंबली होती. दुपारी दोन वाजेच्या सुमारास तहसीलदार यांनी तहसील कार्यालय येऊन आंदोलक शेतकऱ्यांशी संवाद साधला. दरम्यान, दुपारी दोन वाजता तहसीलदार मनीषा मेने या पोलिस बंदोबस्तात तहसील कार्यालयात दाखल झाल्या. त्यानंतर त्यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करत बाधित शेतकऱ्यांच्या यादी अपलोड झाल्या आहेत. शासनाचा अध्यादेश येताच अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, असे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी तहसील कार्यालयावरील कुलूप काढले. या आंदोलनात शेतकरी विजय काळे, ॲड. योगेश पाटील, बंटी कोळे, रवींद्र काळे, राजू दुतोंडे, कृष्णा पाटील, अरुण सोहनी, पूनम परदेशी, दत्तात्रय काटोले, मुना ढगे, पुंडलिक मानकर, अनिल चौधरी, अमोल मापारी, राजू बडक, नितीन पाटील, अजय नेरपगारे, भरत काळे, दिलीप चौधरी, संतोष बोडखे, किशोर मापारी, महेश चौधरी, सुरेश मनगटे, शिवाजी चौधरी राजू बडक विजय गव्हाड आमखेडा येथील शेतकरी हजर होते आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिवृष्टी नुकसानभरपाई तत्काळ दोन दिवसांत खात्यात जमा करावी. कर्जमाफीचा शासन निर्णय त्वरित घ्यावा, पीकविमा मंजूर करून तत्काळ रक्कम अदा करावी, सर्व बाधित शेतकऱ्यांना समान न्याय द्यावा, तालुक्यातील सर्व पिकांची पंचनामे अहवाल लवकर प्रसिद्ध करावेत आदी मागणी शेतकऱ्यांनी केली.

## बीडकरांचा बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठींबा

बीड / प्रतिनिधी : निवडणुकीत शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू म्हणणाऱ्या मुख्यमंत्री आज गप्प का? अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. सरकार मात्र घोषणांचा पाऊस पाडत असून त्वरित तुला दुष्काळ जाहीर करावा, तसेच बच्चू कडू यांनी सुरू केलेल्या आंदोलनातील मागण्या पूर्ण कराव्यात ही मागणी करून बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आसाराम आमटे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.

सरकारने तत्काळ ओला दुष्काळ जाहीर करावा मागे पावसाने शेतकऱ्याच्या हातातील सर्व हिरावून घेतले आहे आता थोडाफार कापूस, सोयाबीन शेतकरी काढत असताना पुन्हा पाऊस सुरू आहे शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात यावी, शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्यात यावा,शेतकऱ्यांच्या कापस, सोयाबीन ऊस पिकाला स्वामीनाथन आयोग प्रमाणे हमी भाव देण्यात यावा, दुधाला म्हैस ६५ रूपये व गाय दूध ५० रुपये दर देण्यात यावा तसेच कांदा ४०रुपये दर देण्यात यावा या शेतकरी नेते बच्चू कडू यांच्या मागण्या सरकारने मान्य कराव्यात या साठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयात आसाराम आमटे माजी संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती बीड यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. बच्चू भाऊ कडू यांच्या लोकशाही मार्गाच्या आंदोलनाला बीड येथील शेतकऱ्यांचा पाठिंबा देण्यात येत आहे या वेळी बाजार समितीचे माजी संचालक आसाराम आमटे,भाऊसाहेब सपकाळ, सुभाष सपकाळ, बबन आमटे, नवनाथ झणझणे, शेख बल्लू पाटील, राजूशेठ अरसमले, अशोक सुरवसे सह आदी उपस्थित होते.


जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/६१९
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १६/१०/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : बाळु विष्णु शिंगाडे सर्व्हे नं.-३६ सहन प्लॉट नं. ४१ नं.प.मि.नं.१८-८५-४१ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-८३-४१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्लॉट नं. ४०
पश्चिम :प्लॉट नं. ४२
दक्षिण- कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तरः प्लॉट नं. ७२

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड



जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/३३१
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १८/०६/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : वनिता अभिजीतसिंग ठाकुर सर्व्हे नं.-७८ सहन प्लॉट नं. ११२ नं.प.मि.नं.१८-१४३-११२ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१४३-११२) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्लॉट नं. ११३
पश्चिम :९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण- १२ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तरः प्लॉट नं. १११

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड


## सुपर ५० उपक्रमातून १० उतीर्ण विद्यार्थ्यांना मोफत जेईई व नीट प्रशिक्षण

### २ नोव्हेंबर रोजी निवड चाचणी

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागातील होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषदेच्या वतीने "सुपर ५०" हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत असून दिनांक २ नोव्हेंबर रोजी निवड चाचणी होणार आहे. विद्यार्थ्यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे केले आहे.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील होतकरू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या माध्यमातून मुलांना डॉक्टर व इंजिनिअर होण्यासाठी आवश्यक प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. आयआयटी - जेईई आणि नीट या राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षांसाठी मोफत प्रशिक्षण देऊन ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची नवी दिशा देण्याचे उद्दिष्ट या उपक्रमामागे आहे. ज्या विद्यार्थ्यांनी आपले अज भरले आहेत, त्या उमेदवारांची निवड चाचणी रविवार दिनांक २ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथील नियोजन सभागृहात सकाळी ११:३० ते १ : ०० या वेळेत होणार असून विद्यार्थ्यांनी सकाळी १०:३० वाजेपर्यंत निवड चाचणीच्या ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी सोबत निळ्या किंवा काळ्या रंगाचा पेन तसेच ओळख पत्र म्हणून आधार कार्ड व त्याची एक झेरॉक्स प्रत घेवून उपस्थित राहणे आवश्यक असल्याचे प्रशिद्धी पत्रकात म्हटले आहे.

cmyk


# नगराध्यक्षपदावर डोळा ठेवून मीडिया ट्रायलचा खेळ!

## जाहिरातबाजी करणाऱ्यांना परळीकरांची पसंती मिळणार का?

परळी । प्रतिनिधी

परळी नगराध्यक्षपदाची शर्यत अजून अधिकृतपणे सुरू व्हायची आहे, पण शहरात मीडिया ट्रायलचा खेळ मात्र जोशात सुरू झाला आहे. सोशल मीडियावर, स्थानिक वर्तमानपत्रांत आणि चौकाचौकांत संभाव्य उमेदवारांच्या अभिनंदन जाहिराती, सेवाभावी संदेश आणि चमकदार फोटोंचा पाऊस पडतोय. मात्र या जाहिरातबाजीतून नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण झाला आहे – ही जाहिरातबाजी करणारी मंडळी खरंच नगराध्यक्षपद पेलवतील का?





Demo pic

शहरात सध्या पोस्टरबाजी आणि स्वतःची प्रसिद्धी मिळवण्यासाठी चिरिमिरीचा खेळ सुरू असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. तथाकथित समाजसेवकांनी चौक ते गल्ली पोस्टरांनी व्यापून टाकले आहेत, तर दुसरीकडे जुने, अनुभवी कार्यकर्ते शांतपणे जनतेच्या समस्या सोडविण्यात गुंतलेले दिसतात. ये पब्लिक है बाबू, सब जानती है...* या संवादाप्रमाणे परळीची जनता सुद्धा सर्व पाहते, ऐकते आणि योग्य वेळ आल्यावर निर्णय घेईल, अशी सर्वसामान्यांमध्ये भावना आहे. कारण नागरिकांना फक्त फोटोसेशन करणारा नव्हे, तर रस्त्यावर उतरून त्यांच्यासाठी लढणारा, काम करणारा नेता हवा आहे. दरम्यान, या निवडणुकीत महिलांचा मोठा सहभाग असणार असल्याने स्पर्धा अधिक रंगणार आहे. बॅनरबाजी, सोशल मीडिया प्रचार आणि अभिनंदन जाहिरातींनी शहराचे राजकीय वातावरण तापले आहे. मात्र जनतेत अशी चर्चा आहे की, जे पैसे देऊन प्रसिद्धी घेत आहेत, त्यांना जनता या वेळी आरसा दाखविल्याशिवाय राहणार नाही.

काही उमेदवार पक्षाच्या बळावर तयारी करत आहेत, तर काही अपक्ष राहून जनतेच्या विकासासाठी पुढे सरसावत आहेत. शहरात सध्या एकच प्रश्न घुमतोय – *कौन मारेगा बाजी, कोण बसेल सिंहासनावर?

परळीकर मात्र ठाम आहेत की यंदा त्यांनी चमकधमक नव्हे, तर खऱ्या अर्थाने काम करणारा, सर्वसामान्यांशी नाळ जुळवणारा उमेदवार निवडायचा आहे. परळीची रणधुमाळी सुरू झाली आहे... आणि नगराध्यक्षपदाचा सिंहासन कोणाच्या नावाने सुशोभित होणार, याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत.

### जाहिरातबाज चेहऱ्यांना पसंती मिळणार का?

चमकदार फोटो, अभिनंदन जाहिराती आणि प्रसिद्धीचा गाजावाजा करणाऱ्यांना जनता या वेळी पसंती देईल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### जुने कार्यकर्ते पुन्हा मैदानात

जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून आवाज उठवणारे, अनेक आंदोलने करून समस्यांचे निराकरण करणारे जुने चेहरे या वेळी प्राधान्य मिळवतील का, हा चर्चेचा विषय ठरला आहे.

### जनतेचा कौल : काम करणारा नेता हवा

जे आमच्या समस्या सोडवतात, अन्यायाविरोधात उभे राहतात, नागरिकांना सुविधा मिळवून देतात – अशा व्यक्तीलाच नगराध्यक्षपद मिळावे, असा सूर सध्या परळीच्या जनतेत उमटतोय. या वेळी अध्यक्षपदाचा निर्णय थेट जनतेच्या हातात असून, जनसेवा आणि बदल हाच खरा मुद्दा ठरणार, असे चित्र स्पष्ट दिसत आहे.

# वाळूंज येथे श्री क्षेत्र भैरवनाथ मंदिर विकासासाठी तब्बल ७८ लाखांची मंजुरी

## आ. सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; ग्रामस्थांकडून कृतज्ञतेची भावना

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र वाळूंज येथील भैरवनाथ मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी तब्बल ७८ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतून मंदिर परिसर सुशोभीकरणासाठी ५० लाख रुपये, तर जिल्हा वार्षिक नियोजन योजनेतून यात्रास्थळ विकासासाठी २८ लाख रुपये असा एकूण ७८ लाख रुपयांचा निधी मराठवाडा भूषण, लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने हे यश मिळाले असल्याने ग्रामस्थांच्यावतीने आमदार सुरेश धस यांचे मा.सरपंच विष्णू खाडे यांनी मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहे.





श्री क्षेत्र वाळूंज हे आष्टी तालुक्यातील श्रद्धेचे आणि भाविकांच्या मनातील एक प्रमुख आध्यात्मिक केंद्र आहे. आमदार सुरेश धस यांची देखील या तीर्थक्षेत्रावर मनोभावे श्रद्धा आहे.येथे प्रत्येक वर्षी चैत्र पौर्णिमा होऊन येणाऱ्या पहिल्या रविवारी भव्य यात्रा महोत्सव भरतो.या यात्रेदरम्यान आष्टी तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून भाविक दर्शनासाठी येतात.यात्रा काळात येणाऱ्या भक्तगणांची राहण्याची, पिण्याच्या पाण्याची, प्रसाद वितरणाची आणि वाहनतळाच्या सुशोभीकरणाची व यात्रास्थळाच्या सुविधांची गरज जाणवत होती. या गरजेला ओळखून आमदार सुरेश धस यांनी भैरवनाथ महाराजांच्या तीर्थक्षेत्राचा विकास व्हावा आणि यात्रेला येणाऱ्या प्रत्येक भक्ताला चांगल्या सुविधा मिळाव्यात,यासाठी राज्य सरकार आणि विविध विभागांकडे सातत्याने पाठपुरावा करून त्यांच्या या प्रयत्नाने भैरवनाथ मंदिर परिसराचा चेहरामोहरा बदलणार आहे.मंदिराच्या विकासासाठी ऐतिहासिक पाऊल उचलले गेले असून श्री भैरवनाथावर वाळूंज ग्रामस्थांसह परिसरातील जामगाव, देवीगव्हाण, केळसांगवी, चिखली, टाकळसिंग, हिंगणी पारगाव जो.आणि मंगरूळ या गावच्या श्रद्धास्थान असलेल्या ग्रामस्थांच्यावतीने आमदार सुरेश धस यांचे वाळूंजचे मा.सरपंच विष्णू खाडे यांनी आभार मानले आहेत.



भारतीय जनता पार्टीत प्रवेश केल्याबद्दल माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा पंचायत समिती माजी उपसभापती भीष्माचार्य दाभाडे, सरपंच किरण आहेर यांच्यासह महारटाकळी, महांडुळा, चकलांबा, मादळमोही, उमापूर, पाडळशिंगी येथील कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

# बच्चु कडु यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत माजलगाव तहसीलवर किसान सभेच्या वतीने जोरदार निदर्शने

माजलगाव । प्रतिनिधी

नागपूर येथे चालू असलेल्या शेतकरी आंदोलनाला पाठिंबा म्हणून माजलगाव येथील किसान सभेच्या वतीने दि ३० ऑक्टोबर गुरुवार रोजी निदर्शने करण्यात आली.या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी, प्रहार,संभाजी ब्रिगेड,शेतकरी कामगार पक्ष,या शेतकरी संघटनेसह शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला



बच्चू कडू व अजित नवले यांच्या नेतृत्वाखाली नागपूर येथे शेतकऱ्यांचे गेल्या तीन दिवसापासून आंदोलन चालू आहे.मात्र सरकारने त्याची दखल घेतली नव्हती.त्यामुळे आंदोलकांनी आक्रमक भूमिका घेऊन जेल भरो आंदोलनाचा निर्णय घेतला. ◀◀ पान ३ वर

# तालुक्यातील ४० अंगणवाड्यांना मिळणार ‘स्मार्ट अंगणवाडी किट’

## डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, मंत्री आदितीताई तटकरे यांचे आभार मानले

बीड । प्रतिनिधी

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाड्यांना आधुनिक सुविधांनी सुसज्ज करण्यासाठी ‘स्मार्ट अंगणवाडी किट’ देण्यास शासनाने मंजुरी दिली असून, या उपक्रमात बीड तालुक्यातील ४० अंगणवाड्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्याबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार, महिला व बालविकास मंत्री आदितीताई तटकरे यांचे आभार मानले आहेत.



राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अंगणवाड्या स्मार्ट करण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत महिला व बालविकास विभागाने बीड तालुक्यातील ४० अंगणवाड्यांना स्मार्ट किट खरेदीस मंजुरी दिली आहे. या योजनेत रायमोह १, हटकरवाडी, आवळवाडी, दगडवाडी, लिंबा, पौंडूळ, धनगरवाडी, रायमोह २, रायमोह ३, वरखेड २, मुळकवाडी, मसेवाडी, ◀◀ पान ३ वर

# धानोरा रोडचे काम तात्काळ सुरु करा -उपाध्ये



बीड । प्रतिनिधी

शहरातील नगर नाका ते पालवन चौक (धानोरा रोडचे) रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्याच्या मागणीसाठी नगरपरिषदेसमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात आले आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की, शहरातील नगर नाका ते पालवन चौक रस्त्याची दुरावस्था झाली आहे या संदर्भात स्थानिक नागरिकांनी अनेक आंदोलन उपोषणे केल्याने प्रशासनाने तात्काळ हा रस्ता डीपीटीसी अंतर्गत प्रस्तावित केला आहे आणि या संदर्भात निधी उपलब्ध झाला असून टेंडरिंग प्रोसेस देखील पूर्ण झाली आहे मात्र अद्यापही वर्क ऑर्डर न झाल्याने या या रस्त्याचे काम रखडलेले आहे तरी आचारसंहिता लागण्याच्या अगोदर हे काम सुरू करण्याचे यावे अशा मागणीचे निवेदन मुख्याधिकारी यांना आंदोलन नितेश उपाध्ये यांच्यासह बीड बचाओ मंचाचे नितीन जायभाय, डी.जी. तांदळे, अशोकजी येडे, फैसल सर, कांता उपाध्ये, रुक्मिणी नागपुरे, शिल्पा पंडित, जालिंदर नाईकवाडे, सवासे सर , राजाभाऊ पिंपळकोठा उपस्थित होते यावेळी मुख्याधिकारी यांनी निवेदनाची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना यासंदर्भात सूचना देत तात्काळ वर्क ऑर्डर करून रस्त्याचे काम सुरू करण्यात येईल असे आश्वासन त्यांनी दिले आहे.

# अंबाजोगाईत कर्जाच्या वादातून अल्पवयीन मुलाचे अपहरण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

चतुरवाडी शिवारातील एका विटभट्टीवर मजुरी करणाऱ्या मजुराच्या अल्पवयीन मुलाचे अपहरण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अरविंद गायकवाड (रा. सिरसाळा, ह.मु. तपोवन) व त्याचे चार अनोळखी साथीदारांविरुद्ध अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी राजखान चाँदखान पठाण (रा. हरंगुळ, ता. गंगाखेड, ह.मु. चतुरवाडी शिवार, अंबाजोगाई) यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले की, त्यांनी आरोपी अरविंद गायकवाड याच्याकडून आठ महिन्यांपूर्वी २५ हजार रुपये हातउसने घेतले होते. त्यातील २० हजार रुपये परत केले असून केवळ ५ हजार रुपये देणे बाकी आहे.दि. २८ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.३० वाजता फिर्यादींचा मुलगा शाहेद (वय १७) याने फोन करून सांगितले की, अरविंद गायकवाड व त्याचे चार साथीदार विटभट्टीवर दोन मोटारसायकलींवर आले असून त्याला शिवीगाळ करून तुझ्या वडिलांनी ७० हजार रुपये दिल्यावरच तुला सोडतो अशी धमकी देत जबरदस्तीने घेऊन जात आहेत.फिर्यादींनी आरोपीशी फोनवर चर्चा केली असता आरोपीने ◀◀ पान ३ वर

# युसूफवडगाव येथील मंडळ कृषी कार्यालय वर्षातून तीनदाच उघडते

**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील मंडळ कृषी कार्यालय हे वर्षातुन फक्त प्रजासत्ताक दिन,स्वातंत्र्य दिन,१ मे व १७ सप्टेंबरला झेंडा वंदन व ध्वजारोहणासाठी व महिन्यातुन १ दिवस मिटिंगसाठी उघडल जाणारे व इतर दिवस हे कार्यालय कायम बंद असल्याने शेतकऱ्यांना अडचणी येतात.**





युसूफवडगांव येथे असलेले व २७ गावांचे कार्यक्षेत्र असणारे मंडळ कृषी कार्यालय हे कायम बंद असल्याने या २७ गावामधील शेतकऱ्यांना कृषी विभागाशी कामा संदर्भात सतत अडचणी येतात कुठल्याही लहान सहान कामासाठी शेतकऱ्यांना अधिकारी व कर्मचारी शोधत केजला तालुक्याच्या ठिकाणी कामधंदा सोडून जावे लागते.युसूफवडगांव परिक्षेत्रातील २७ गावामधील शेतकऱ्यांच्या सोयीसाठी शासनाने युसूफवडगांव येथे मंडळ कृषी कार्यालय उघडून ठेवले आहे पण तेथे कोणीच अधिकारी व कर्मचारी उपस्थित नसतात कारण हे कार्यालय कायम कुलूप बंद असते.हे कार्यालय वर्षातुन फक्त प्रजासत्ताक दिन,स्वातंत्र्य दिन,१ मे व १७ सप्टेंबरला व महिन्यात एक दिवस मिटिंगसाठी उघडले जाते एकुण विचार केला तर हे कार्यालय वर्षातुन जेमतेम ४८/५० दिवसांसाठी उघडले जाते ते पण शेतकऱ्यांच्या कामासाठी नाही तर फक्त मिटिंगसाठी बाकी दिवस हे कायम बंद असते त्यामुळे शेतकऱ्यांना अडचणी येतात.

कुठल्या लहान-सहान कामासाठी अथवा फाईलवर सही पाहिजे असेल तर अधिकारी,सुपरवायझर व कर्मचारी सापडत नाहीत मग शेतकऱ्यांनी कुणाकडे जायचे हुकून-चुकून जर अधिकारी व सुपरवायझर सापडले तर या केजला मग येथील ऑफिस काय कामाचे येथील ऑफिसचा कारभार जर केजहुन हाकला जाणार असेल शासनाने युसूफवडगांव येथील मंडळ कृषी कार्यालय कायमचे बंद करून शेतकऱ्यांवर उपकार सतत गैरहजर राहणाऱ्या महिला अधिकारी व कर्मचारी यांच्यावर योग्य ती कारवाई करून हे कार्यालय कायम शेतकऱ्यांच्या कामासाठी कसे उघडे ठेवता येईल याची दक्षता घ्यावी अशीच शेतकऱ्यांची ईच्छा आहे.









This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पिंपरी चिंचवड महापालिकेचा सात महिन्यांत ६२४ कोटी ८५ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत पहिल्या सात महिन्यांतच तब्बल ६२४ कोटी ८५ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. चालू आर्थिक वर्षात नागरिकांचा वाढता प्रतिसाद, विभागाचे नियोजनबद्ध कामकाज आणि विविध सवलतींचा लाभ या सर्व घटकांमुळे कर संकलनात विक्रमी वाढ झाली आहे. शहरात सध्या एकूण ७ लाख ४० हजार मालमत्तांची नोंद असून, त्यापैकी ४ लाख ७८ हजार मालमत्ताधारकांनी आतापर्यंत कर भरणा केला आहे. ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कर भरला नाही, त्यांनी तो लवकरात लवकर भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

> पिंपरी चिंचवडकरांनी मालमत्ता कर भरण्यासाठी दाखवलेला उत्साह ही शहराच्या प्रगतीची खरी ओळख आहे. नागरिकांनी वेळेवर कर भरून महापालिकेच्या विकासकामांना बळ दिले आहे. ही फक्त वसुलीची आकडेवारी नाही, तर शहराच्या जबाबदार नागरिकत्वाची खूण आहे. प्रशासन आणि नागरिकांच्या या संयुक्त प्रयत्नांमुळे पिंपरी चिंचवड शहर नक्कीच विकासाच्या नवीन उंची गाठेल.
> – प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत यंदा ऑक्टोबर महिन्यात कर वसुलीचा आकडा मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये १ एप्रिल २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२४ या काळात ५४२ कोटी ६० लाख रुपये इतका मालमत्ता कर वसूल झाला होता. त्याच्या तुलनेत चालू आर्थिक वर्षात पहिल्या सात महिन्यांत म्हणजेच १ एप्रिल २०२५ ते ३० ऑक्टोबर २०२५ या कालावधीत ६२४ कोटी ८५ लाख रुपये म्हणजेच तब्बल ८२ कोटी २५ लाख रुपयांचा मालमत्ता कर अधिक वसूल झाला आहे.

पहिल्या व दुसऱ्या तिमाहीत नागरिकांनी कर भरण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून विभागाने विविध सवलती जाहीर करण्यासोबतच मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यावर भर दिला होता. त्याला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. अनेक करदात्यांनी ऑनलाईन पर्यायांचा वापर करून घरबसल्या कराचा भरणा केला, तर काहींनी महापालिकेच्या काऊंटरवर थेट कराचा भरणा केला.

### ऑनलाईन कर भरण्यास प्राधान्य

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक ऑनलाईन माध्यमातून मालमत्ता कर भरण्यास प्राधान्य देत आहेत. चालू आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२५ ते ३० ऑक्टोबर २०२५ पर्यंत ४ लाख ७८ हजार मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला असून, त्यापैकी ३ लाख ९१ हजार मालमत्ताधारकांनी ऑनलाईन कर भरला आहे. ऑनलाईन कर भरण्यात आलेली रक्कम ही ४९६ कोटी रुपये आहे.

> कर संकलन व कर आकारणी विभागाच्या नियोजनबद्ध कामकाज, डिजिटल सुविधा आणि जनजागृती मोहिमेमुळे कर संकलनात लक्षणीय वाढ झाली आहे. नागरिकांना घरबसल्या कर भरण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली असून, याचा मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यात आला आहे. पुढील काळात ही गती कायम ठेवत करदात्यांना अधिक सुलभ सेवा देण्याचा आमचा प्रयत्न राहील.
> – पंकज पाटील, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# शिरुर तालुक्यात ८५ हजार रुपयांची शेती अवजारे चोरी

शिरुर । प्रतिनिधी

शिरुर तालुक्याच्या पुर्व भागातील निर्वी गावात अज्ञात चोरट्याने शेतातून तब्बल ८५ हजार किमतीची शेती मशागतीची अवजारे चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे.



याबाबत दिनेश गुलाब टिंगरे (वय ३५, रा. विश्रांतवाडी) यांनी शिरुर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्याद दाखल केली असुन त्यांच्या निर्वी येथील गट क्र ५९४ मधील शेतातील घरातुन दि. २८ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री १० ते २९ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ९ च्या दरम्यान हि चोरीची घटना घडली आहे.यावेळी चोरट्यानी हायड डबल रिव्हर्सीबल प्लग (४५ एचपी कंपनीचा नांगर, किंमत अंदाजे ६०हजार) आणि काकया सीड डील मॅन्युअल (९ टाइन कंपनीचे अवजार, किंमत अंदाजे २५ हजार) अशी एकूण ८५ हजार रुपयांची शेती मशागतीची अवजारे लंपास केली आहेत. या प्रकरणी शिरुर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असुन तपास पोलिस हवालदार विनोद मोरे हे करीत आहेत.

# ‘एआय’ देणार बिबट्याची चाहूल शेतकऱ्यांना मिळणार अलर्ट

**पुणे । प्रतिनिधी**

ऊस शेतीमुळे घराच्या उंबऱ्यापर्यंत पोहोचलेल्या बिबट्यापासून संरक्षणासाठी जुन्नर वन विभागाने पुढाकार घेतला आहे. यासाठी ‘एआय’ (कृत्रिम बुद्धिमत्ता) आधारित तंत्रज्ञानावर कॅमेरे जुन्नर, खेड, आंबेगाव, शिरूर तालुक्यांतील बिबट्याप्रवण क्षेत्रातील ५५ हॉटस्पॉटवर बसविण्यात आले आहेत.



या तंत्रज्ञानामुळे कॅमेऱ्याच्या नियंत्रण क्षेत्रात बिबट्या आल्यानंतर ध्वनिक्षेपकावरून सायरन वाजल्यावर शेतकऱ्यांना अलर्ट मिळत आहे. यामुळे काही प्रमाणात शेतकरी सुरक्षित होण्यास मदत होत आहे. याबाबतची माहिती जुन्नर वन विभागाचे उपवनसंरक्षक प्रशांत खाडे यांनी दिली. ते म्हणाले, ‘‘उसातील बिबट्यांमुळे निर्माण झालेला शेतकरी-बिबट्या संघर्ष निवारणासाठी वन विभागाद्वारे विविध तातडीच्या आणि दीर्घकालीन उपाययोजना केल्या जात आहेत. यामध्ये आता एआय आधारित सीसीटीव्ही कॅमेरे आणि सायरन बसविण्याचा प्रयोग यशस्वी झाला आहे. यामध्ये जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरूर या तालुक्यांमधील ऊस पट्ट्यात आणि मानवी वस्तीलगत हे कॅमेरे बसविण्यात आले आहेत. यासाठी विशेष खांब उभारण्यात आले असून, त्यावरच सायरन लावण्यात आला आहे.या कॅमेऱ्याच्या परिघात बिबट्याचा वावर आल्यास अनायडर मोशन सेन्सरद्वारे कॅमेरा छायाचित्र टिपून लगेच सायरन वाजतो. यामुळे मानवी वस्तीत बिबट्या आल्याचा अलर्ट मिळत आहे.’’यामध्ये शिरूर तालुक्यातील पिंपळाचा मळा, मांडवगण फराटा, फराटेवाडी, शिवनगर, फिरंगी मळा, पिंपळसुटी या भागांत जास्त लक्ष केंद्रित केले आहे. टप्प्याटप्प्याने ही यंत्रणा ऊस प्रवण क्षेत्रातील विविध गावांमध्ये बसविण्यात येणार आहे, असेही श्री. खाडे यांनी सांगितले.

# धर्मादाय आयुक्तांकडून ४ तारखेचा व्यवहार रद्द; अखेर गोखले बिल्डर्सकडून जैन बोर्डिंग ट्रस्टला मिळाली

पुणे । प्रतिनिधी

शहरातील कोथरुड येथील जैन बोर्डिंग जमीन व्यवहार प्रकरणात जैन ट्रस्ट आणि गोखले बिल्डर यांच्यात झालेला जमीन व्यवहार अखेर रद्द करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी जमीन गैरव्यवहारप्रकरणावरुन मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर गंभीर आरोप करणअयात आल्यानंतर गोखले बिल्डर्सकडून हा जमीन व्यवहार रद्द करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले होते. त्यानुसार, गोखले बिल्डर्सने माघार घेताच आता, धर्मादाय आयुक्त यांनी जमीन व्यवहार रद्द करण्याचे आदेश दिले आहेत.







गोखले बिल्डर्स आणि जैन बोर्डिंग ट्रस्ट यांच्यात कोथरुड येथील जागेसंदर्भात मोठा आर्थिक व्यवहार झाला होता. शिवसेना नेते तथा माजी आमदार रविंद्र धंगेकर यांनी याप्रकरणी केंद्रीयमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर गंभीर आरोप केले होते. तब्बल ३००० कोटींच्या घरात हा व्यवहार असून मोठा भ्रष्टाचार व जैन बोर्डिंगची जमीन लाटण्याचा प्रयत्न होत असल्याचे धंगेकर यांनी म्हटले होते. त्यानंतर, वरिष्ठ पातळीवर दबाव येताच, मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या व्यवहारातून आपले हात काढून घेतले. तर, गोखले बिल्डर्सनेही हा व्यवहार रद्द करत असल्याचे सांगितले होते. त्यानुसार आता कायदेशीर मार्गाने हा व्यवहार रद्द झाला आहे. धर्मादाय कार्यालयाकडून थोड्याच वेळात अधिकृत निकालाची प्रत प्राप्त होणार आहे. ४ एप्रिल २०२५ रोजी धर्मादाय आयुक्त यांनी या व्यवहारासंदर्भात दिलेले स्वतःचेच आदेश रद्द केले आहेत. ४ तारखेचा आदेश रद्द केल्यामुळे त्यानंतर झालेली सर्व प्रक्रिया कायद्यानुसार अमान्य ठरते. या जमीन व्यवहारासाठी गोखले बिक्डर यांनी ट्रस्टला दिलेले २३० कोटी रुपये सिव्हिल कोर्टाच्या आदेशाने परत मिळणार आहेत. मात्र, गोखले बिल्डरला पैसे परत मिळवण्यासाठी सिव्हिल कोर्टाची पायरी चढावी लागणार आहे. तर, स्टँप ड्यूटीही परत मिळवण्यासाठी कायदेशीर लढा लढवा लागणार आहे. आता, हा व्यवहार रद्द झाल्याने गेल्या १५ दिवसांपासून सुरू असलेला जागेच्या व्यवहाराचा वाद आणि भ्रष्टाचाराचा विषय संपुष्टात आला असेच म्हणता येईल.

### धंगेकर यांच्याकडून चौकशीची मागणी

दरम्यान, जैन बोर्डिंग प्रकरणातून बिल्डर गोखलेने माघार घेतली असली तरी या गैरव्यवहाराची चौकशी व्हावी, अशी मागणी रविंद्र धंगेकर यांच्याकडून करण्यात आली आहे. एवढ्या मोठ्या जागेचा व्यवहार कोणी केला, याचा तपास व्हावा, असे धंगेकरांनी म्हटले. ते गुरुवारी पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. धर्मादाय आयुक्त आणि बाकी बिल्डर राजकारणी यांचे काय लागेबांधे आहेत, याची चौकशी झाली पाहिजे. धर्मादाय आयुक्तालयात अनेक वर्षे प्रकरण पेंडिंग राहतात पण यावेळी लगेच सगळं का करण्यात आले?, असा सवाल रविंद्र धंगेकर यांनी उपस्थित केला आहे.

# ‘हरित प्रतिज्ञा’ घेऊन माझी वसुंधरा अभियानात सहभागी व्हा

पिंपरी । प्रतिनिधी

पर्यावरण संवर्धन, हवामान बदल नियंत्रण आणि हरित जीवनशैलीचा प्रसार या उद्देशाने राज्य शासनाने सुरू केलेल्या माझी वसुंधरा या उपक्रमात ‘हरित प्रतिज्ञा’ घेऊन सहभागी व्हावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने नागरिकांना करण्यात आले आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून नागरिकांमध्ये वसुंधरा संवर्धन, हरित सवयी आणि जबाबदार नागरी सहभाग वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. तसेच माझी वसुंधरा अभियानामध्ये जास्तीतजास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, यासाठी विविध विभागांमध्ये समन्वय साधून विशेष कार्ययोजना आखण्यात आली आहे. शाळा, महाविद्यालये, उद्योगसंस्था, महिला बचत गट, रहिवासी संघटना आणि सामाजिक संस्था यांनाही या उपक्रमात सहभागी होण्यासाठी जनजागृतीच्या माध्यमातून प्रोत्साहित केले जात असून, त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. आता या मोहिमेचा भाग म्हणून शहरातील नागरिकांनी ऑनलाईन पद्धतीने ‘हरित प्रतिज्ञा’ घेऊन पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संकल्प करून आपल्या कृतीतून निसर्गसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच या अभियानांतर्गत नागरिकांनी झाड लावताना, वृक्षारोपण करताना किंवा हरित उपक्रमात सहभागी होताना एक फोटो घेऊन तो सोशल मीडियावर अपलोड करावा आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अधिकृत सोशल मीडिया पेजेसना टॅग करावे, असे आवाहन आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

# जीममध्ये व्यायाम करताना अस्वस्थ वाटू लागले; पुण्यात अग्निशमन दलातील जवानाचा अकाली मृत्यू

पिंपरी चिंचवड

पुणे : अलिकडच्या काळात विविध आजार आणि तरुण वयातच हृदयविकाराच्या घटनांचं प्रमाण वाढत असल्याचं पाहायला मिळत आहे. कधी जीममध्ये व्यायाम करताना, तर कधी क्रिकेटच्या मैदानावरच खाली कोसळून मृत्यू झाल्याच्याही दुर्दैवी घटना गडल्या आहेत. आता, पिंपरी-चिंचवड (झींपिश) शहरातील चोविसावाडी फायर स्टेशन येथे मंगळवारी सायंकाळी जिममध्ये व्यायाम करत असताना अग्निशमन दलाचे (ऋळीश लीळसरवश) ३१ वर्षीय जवान राजेश रामभाऊ राऊत यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांचा अकाली निधनाने अनेकांना धक्का बसला असून परिसरात शोककळा पसरली आहे.

राजेश राऊत हे मंगळवारी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास फायर स्टेशनमधील जीममध्ये नेहमीप्रमाणे व्यायाम करत होते. व्यायामादरम्यान त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने थोडावेळ आराम करण्यासाठी ते खाली आले. काही वेळानंतर सहकाऱ्यांनी पाहिले असता, ते बेशुद्ध अवस्थेत आढळले. त्यामुळे, जिममधील सहकाऱ्यांनी त्यांना त्वरित जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.







पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचा मृत्यू झाला असावा असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या दुःखद घटनेमुळे अग्निशमन दलातील त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये शोककळा पसरली आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या संत तुकारामनगर येथील मुख्य अग्निशमन केंद्र येथे जवान राजेश यांना त्यांच्या सहकाऱ्यांनी आज अखेरची सलामी दिली आहे. यावेळी, परिसरात शोककळा पसरली होती.

# महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन निवडणूक : अजित पवारांना नव्हे, कारभाराला विरोध : मुरलीधर मोहोळ

पुणे : महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष अजित पवार यांना आमचा विरोध नाही. मात्र, संघटनेचे सचिव नामदेव शिरगावकर यांच्या कार्यशैलीला आमचा विरोध आहे. जशी माझ्या संघटनेची शिरगावकर यांच्याविरोधात तक्रार आहे, तशा इतरही अनेक संघटनांच्या तक्रारी आहेत. आम्ही केलेल्या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने आम्हाला असोसिएशन निवडणुकीच्या रिंगणात उतरावे लागले असल्याची भूमिका केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केली.



महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या निवडणुकीमध्ये असोसिएशनचे विद्यमान अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज भरले आहेत. यासाठी २ नोव्हेंबररोजी मतदान होणार आहे. थलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बास्केटबॉल, फुटबॉल, जिम्नॅस्टिक, हॉकी, ज्युडो, खो-खो, टेनिस, रायफल, रोईंग यांसारख्या २२ संघटनांचे प्रतिनिधी मतदानात सहभागी होणार आहेत.

या पार्श्वभूमीवर मोहोळ यांनी गुरुवारी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, सचिवांचा मनमानी कारभार सुरू होता. आमच्या संघटनेला मान्यता दिली जात नव्हती, इतर संघटनांच्याही सचिवांच्या संदर्भात तक्रारी होत्या. यामध्ये अजित पवार यांनी लक्ष घालावे, एवढीच आमची अपेक्षा होती. मात्र, त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे आम्ही निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आहे. या निवडणुकीचा राजकारणाशी कसलाही संबंध नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निवडणुकीत लक्ष घातलेले नसल्याचेही मोहोळ यांनी यावेळी स्पष्ट केले.

# खराडीत अनधिकृत बांधकामांवर हातोडा

येरवडा – पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागाने बुधवारी (दि. २९) खराडी परिसरात अतिक्रमणांविरोधात मोठी मोहीम राबवून अनधिकृत बांधकामांवर थेट हातोडा टाकला. चंदननगरमधील जुना मुंढवा रस्ता ते संघर्ष चौकापर्यंतच्या गोविंदसागर सोसायटी परिसरातील प्रसिद्ध खाऊ गल्लीत महापालिकेने धडक कारवाई करीत सुमारे १७ हजार ५०० चौ.फुट क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त केले.



हॉटेल आणि किराणा मालाचे दुकान, स्नॅक्स सेंटर इत्यादी अनधिकृत बांधकामे आणि इमारतीसमोरील बांधकाम अंदाजे १७ हजार ५०० चौरस फूट क्षेत्रावरील पाडण्यात आले. महापालिका बांधकाम विकास विभाग झोन क्र. १ यांच्यामार्फत अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली आहे.

या कारवाईत बांधकाम विकास विभाग झोन क्र. १ कार्यकारी अभियंता सुरेश साखळे, उपअभियंता विवेक डुब्बेवार, कनिष्ठ अभियंता उमेश गोडगे व आरेखक योगेश गुरव यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आली. ही कारवाई केल्यानंतर नागरिकांनी कृपया दर्शनी सामायिक अंतरामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम व पत्राशेड उभारू नये अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा बांधकाम विभागाने दिला आहे.

# मराठीच्या भवितव्याची चिंता करु नका, ती चिरंतर काळ टिकेल

पुणे : भारतात ज्या उत्तमोत्तम भाषा आहेत, ज्या वाचल्या जातात, ज्या भाषेमध्ये अधिक ग्रंथ खपतात, ज्या भाषेतील साहित्य गांभीर्याने घेतले जाते, त्यात बंगाली, मल्याळम आणि मराठी भाषेचा समावेश आहे. सहा राज्यांमध्ये जवळपास हिंदी भाषिक वास्तव्यास असूनही मराठीचा व्यवहार हिंदीपेक्षा मोठा आहे. त्यामुळे मराठी भाषा ही चिरंतर काळ टिकणार आहे. तिच्या भवितव्याची चिंता कोणी करु नये, असे मत सातारा येथे होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष विश्वास पाटील यांनी गुरुवारी (दि.३०) व्यक्त केले.



पुणे बुक फेअर या ग्रंथ प्रदर्शनाचे आणि मराठी साहित्य मेळ्याचे उद्घाटन विश्वास पाटील यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार, अतिरिक्त विभागीय आयुक्त स्वाती देशमुख, सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया, प्रसारभारतीचे इंद्रजित बागल, पुणे बुक फेअरचे संयोजक पी. एन. आर. राजन, शिरीष चिटणीस यावेळी उपस्थित होते.

प्रा. जोशी म्हणाले, साहित्य ही धर्म, प्रांत, जात, भाषेच्या पलीकडे माणसे जोडणारी शक्ती आहे. आजच्या घडीला भाषाभगिनींमध्ये स्नेह वाढला पाहिजे. जागतिकीकरणानंतर वाचकांच्या जाणीवांचा परीघ सुद्धा विस्तारलेला नाही. त्यामुळे फक्त आपल्या भाषेपुरता विचार न करता आपण अन्य भारतीय भाषा आणि जगभरातील भाषांमधील उत्तम साहित्य वाचले पाहिजे, अशी वाचकांची मानसिकता झाली आहे. ती खूप महत्त्वाची आहे. आजच्या समाजाला डिजिटल जगातून बाहेर पडण्याची गरज आहे. ग्रामीण भागात पुस्तक जत्रा आयोजित करण्याची गरज आहे.

# नोकरी, लग्नाचे आमिष दाखवत तरुणीवर अत्याचार

**बारामती । प्रतिनिधी**

लग्नाचे व नोकरीचे आमिष दाखवत एका २७ वर्षीय महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणी बारामतीतील उद्योजक मनोज कुंडलिक तुपे (रा. ग्रीन पार्क सोसायटी, विद्या प्रतिष्ठानजवळ, बारामती) याच्याविरोधात हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित महिलेने याबाबत फिर्याद दिली. ऑगस्ट २०२१ ते १५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत पुण्यातील गाडीतळ, हडपसर, शिवाजीनगर, विमाननगर, चंदननगर, मगरपट्टा आदी भागांतील वेगवेगळ्या हॉटेल्समध्ये ही घटना घडली आहे.

पीडित महिलेने बारामतीत २०२० मध्ये शिक्षण पूर्ण केले. पुढे २०२१ मध्ये ती बारामतीतच एमपीएससीचा अभ्यास करीत होती. मे २०२१ मध्ये ती पुण्यात राहण्यास गेली. जानेवारी २०२१ मध्ये ती बारामतीत मैत्रिणीसोबत एका हॉटेलात जेवणासाठी गेली असताना त्यांची तुपे यांच्याशी ओळख झाली. मी मोठा बिझनेसमन आहे, तुला व तुझ्या मैत्रिणीला नोकरी देतो असे सांगत त्याने तिचा मोबाईल क्रमांक घेतला. त्यानंतर काही दिवस फोनवर बोलून नोकरीचे आश्वासन दिले. ती पुण्यात राहण्यास गेल्यानंतर ऑगस्ट २०२१ मध्ये तुपे याने तिला कॉल करत जेवणासाठी बोलावले.त्यांनी एकत्र जेवण केल्यानंतर रात्री मी बारामतीला निघालो आहे, माझ्यासोबत हडपसरपर्यंत चल, तेथून तुला पुन्हा गाडीत घरी पाठवतो असे त्याने महिलेला सांगितले. फिर्यादी त्याच्यासोबत येत असताना साधना शाळेजवळील एका वर्दळ नसलेल्या ठिकाणी मोटार थांबवत त्याने तिच्याशी इच्छा नसताना मोटारीतच संबंध ठेवले. त्यानंतर गाडीतळ येथे आणून तेथून रिक्षा करून दिली. त्यानंतर तो फिर्यादीशी फोनद्वारे बोलत होता. लवकरच लग्न करू असे आश्वासन देत होता. पुण्यातील वेगवेगळ्या हॉटेल्स आणि मोटारीत कामाचे आमिष दाखवून तो शरीरसंबंध ठेवत होता.